**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२७७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री अभय अण्णाजी तांबोळी<br>रा. मेन रोड, सुभाष चौक, हिंगणघाट<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |
| | **वि रु ध्द** | | |
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक<br>भूमी अभिलेख, नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | (i) जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक<br>भूमी अभिलेख वर्धा<br>(ii) जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक<br>भूमि अभिलेख समुद्रपूर ता. समुद्रपूर जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा निरिक्षक भूमि अभिलेख, समुद्रपूर श्री जी. सी. खीची हे हजर आहेत. तसेच उपसंचालक भूमी अभिलेख नागपूर यांचे वतीने श्री धामनकर, हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी, तथा जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख वर्धा श्री जोशी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील दि.१९/१०/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा उपअधिक्षक, भूमि अभिलेख समुद्रपूर यांच्याकडे मौजा जाम येथील पुर्नमोजणी नकाशाच्या संदर्भात मौजा जाम ते

पंचगव्हाण पांदण / रस्त्याबाबत सर्व्हे नं. ४८, ५०, ५६ मध्ये पांदण रस्ता दर्शविण्यात आला आहे त्या बाबतची माहिती मागितलेली आहे. त्यांना विहीत मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.३१/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १५/०३/२०११ रोजी देण्यात आला आहे. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक भूमि अभिलेख समुद्रपूर यांनी घेतलेला निर्णय बरोबर आहे आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे नमूद करुन सदरचे प्रथम अपील खारीज केले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.१४/०२/२०११ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक, भूमि अभिलेख समुद्रपूर यांच्याकडे सन १९८३-८४ मधील शेत सर्वे नं.४८, ५०, ५६ बाबत मौजा जाम ता. समुद्रपूर, जि. वर्धा येथील पांदण/रस्ता याबाबत माहिती मागितली होती. परंतू तलाठयामार्फत दिलेल्या दस्तऐवजांमध्ये रस्ता दर्शविलेला नाही. तसेच दि. ०८/०९/२०१० च्या अहवालात अभिलेखात पुर्नमोजणी पांदण रस्ता दर्शविला नाही असे नमूद केले आहे त्याबाबतची देखील माहिती दिली नाही. गावनकाशा हस्तांतरीत करण्यात आला त्याची प्रत दिली नाही अशी विविध माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे अपीलार्थीने सांगितले. त्यानंतर प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपील खारीज केल्यामुळे आयोगाकडे दुसरे अपील केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उप अधिक्षक भुमी अभिलेख श्री खिची यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. १९/१०/२०१० ला प्राप्त झाला होता. अपीलार्थीने खुलासा स्पष्टीकरण व अभिप्राय स्वरुपात माहिती मागितल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ (च) नुसार माहिती नसल्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध नसल्याबाबत दि. २७/१०/२०१० च्या पत्रान्वये कळविले आहे. परंतू पुर्नमोजणी अ शिट ची नक्कल कार्यालयात उपलब्ध असून त्याबाबत रु. ३०/- फी चा भरणा करुन कार्यालयात येवून माहिती घेऊन जाण्याबाबत अपीलार्थीला कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील उपसंचालक यांचेकडे दाखल केले. आणि सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आले. यावर अपीलार्थीचे प्रामुख्याने असे म्हणणे आहे की, सद्यस्थितीत तलाठी जाम यांच्याकडे सव्हे्र नं. ४८,

५०, ५६ बाबत मौजे जाम ते पंचगव्हाण पांदण रस्त्याबाबत जो नकाशा उपलब्ध आहे त्या नकाशामध्ये रस्ता दर्शविण्यात आलेला नाही. मात्र आता पुर्नमोजणी नुसार तयार झालेल्या या सर्व्हे नं. मध्ये रस्ता दर्शविलेला आहे म्हणून तलाठयाच्या त्या संबंधित रेकॉर्डमध्ये याबाबत दुरुस्ती होणे आवश्यक आहे यासाठी भूमी अभिलेख कार्यालयाने सदरच्या पूर्नमोजणीचा नकाशा संबंधित तलाठयाकडे त्यांच्या रेकॉर्डचची दुरुस्ती होण्याकरिता पाठवावा असे अपीलार्थीने सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित तलाठयाच्या रेकॉर्ड मध्ये दुरुस्ती होण्यासाठी पुर्नमोजणीचा नकाशा जनमाहिती अधिकारी यांनी संबंधित तलाठयाकडे पाठविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी पुर्नमोजणी नकाशा संबंधित तलाठी यांच्याकडे त्यांच्या रेकॉर्डच्या दुरुस्तीसाठी पाठवावा आणि त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३१३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संतोष सियारामशरण दुबे<br>टेंपल बाजार, बुटी रोड, सिताबर्डी नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक<br>भूमि अभिलेख नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र. ३<br>नगर भूमापन कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ नगापूर श्री हट्टेवार हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमी अभिलेख नागपूर श्री सुर्यवंशी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता हे सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर यांच्याकडे दि. ३०/११/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन मोजणी

मामला क्र. ७७८/९८ बाबत क प्रत पुरविणेबाबत ची माहिती मागितलेली आहे. तसेच मौजा सिताबर्डी नागपूर स्थित न. भू. क्र. २९७८ शिट क्र. ७६+७७ मोजणी मामला क्र. ७७८/९८ मोजणी दि. १८/०७/९९ अर्जदार जी.डी. कंपनी तर्फे दिलीपकुमार पचेरीवाला चे क प्रत ची प्रमाणित प्रत मागितलेली असून त्याकरिता आवश्यक ते शुल्क भरण्यास तयार असल्याचे अपीलकर्ता यांनी नमूद केले आहे. आणि सदर माहिती व्यक्तीशः घेणार असेही नमूद केलेले दिसून येते.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्र.३ नागपूर शहर श्री हट्टेवार हे हजर आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक, भूमि अभिलेख नागपूर श्री सुर्यवंशी हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी श्री हट्टेवार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.३०/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०१/१२/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने न. भू. क्र. २९७८ शिट क्र.७६-७७ मोजणी मामला क्र. ७७८-९८ दि. १८/०७/१९९९ अर्जदार जी.डी. कंपनी तर्फे दिलीपकुमार पचेरीवालाचे क प्रत ची प्रमाणित प्रत आणि नकाशाची प्रत मागितली होती. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सन १९९८-९९ या कालावधीतील म्हणजेच सुमारे १२ वर्षापूर्वीची असल्यामुळे अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयात घेण्यात आला. तथापी माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीस प्रथमतः दि.२७/१२/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, सदरचा मोजणी मामला क्र. ७७८/९८ हा सन ९८-९९ पासूनचा आहे. सदर मोजणी प्रकरणाचा अभिलेखागारात शोध घेणे सुरु आहे सदर मोजणी मामला आढळल्यानंतर क प्रत पुरविण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी यांनी दि.२७/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविले असल्याचे सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने दि.२८/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि. १२/०१/२०११ रोजी घेण्यात आली. आणि निर्णय दि. २४/०१/२०११ रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये असे नमूद केले की, जनमाहिती अधिकारी यांनी प्रस्तुत मोजणी मामला प्रकरणाचा पुन्हा शोध घेऊन अपीलकर्त्यास क प्रत २० दिवसांचे आत देण्यात यावी.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर त्याला अनुसरुन अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा पुन्हा त्यांच्या कार्यालयात शोध घेण्यात आला. त्यानंतर अभिलेख कक्षाचे प्रमुख अभिलेखापाल यांनी दि.१७/०२/२०११ ला अहवाल सादर केला. आणि त्यामध्ये

असे नमूद केले की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीचा शोध घेतला परंतू सदरचे प्रकरण अभिलेखकक्षात उपलब्ध झाले नाही. म्हणून अभिलेखापालाचया अहवालानंतर अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. १७/०२/२०११ च्या पत्रान्वये अभिलेखकक्षात सदर प्रकरण आढळ होत नसल्याचे कळविले म्हणून माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे कळविले असल्याचे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सुमारे १२ वर्षापूर्वीची आहे. जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयात या प्रकरणाचा शोध घेतला असता अभिलेखकक्षाच्या प्रमुखांनी देखील सदरचे प्रकरण अभिलेख कक्षात दिसून येत नाही असा अहवाल दिला असल्यामुळे सदर माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देता आली नाही. आणि याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२७६/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शुभराज मधुकरराव गजरे<br>रा. धाडी पो. साहुर<br>ता. आष्टी जि. वर्धा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपिअभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी<br>ता. आर्वी जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०१/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपअभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी श्री पंडीत हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी श्री होतवाणी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग आर्वी जि. वर्धा यांचेकडे दि. ०१/०४/२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन तळेगाव ते दुर्गवाडा रस्ता दुपदरी करण्याकरिता रस्त्याच्या कामामध्ये बाधा ठरणारी बाभळीची एकूण किती झाडे तोडण्यात आली, कोणकोणत्या अटीस अधिन राहून झाडे तोडण्याचा लिलाव देण्यात आला, एकूण झाडांचा लिलाव किती रुपयात देण्यात आला, झाडांच्या लिलावाची मुख्य अट काय होती अशी एकूण ४ मुद्यांमध्ये माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली परंतू सदर माहिती ही चुकीची असल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.०४/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/१०/२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्पर अपूर्ण व दिशाभुल करणारी माहिती दिली म्हणून प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपील खारीज करण्यात आल्यामुळे या निर्णयाने समाधान झाले नाही म्हणून संबंधित माहिती अधिकारी यांचेवर शास्ती लादण्यात यावी अशी आयोगापुढे अपीलार्थीने मागणी केली.

४. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि.०१/०४/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविला होता. मात्र प्रस्तुत प्रकरणात उप अभियंता हे जनमाहिती अधिकारी असल्यामुळे त्यांच्याकडून अपीलार्थीचा माहितीचा अर्ज दि. १९/०४/२०१० रोजी त्यांच्याकडे प्राप्त झाला अपीलार्थीने मागितलेल्या माहिती बाबत खात्री करण्यात आली. आणि अपीलार्थीस दि. १९/०४/२०१० च्या पत्रान्वये माहितीचे शुल्क रु. २/- आणि टपालाऐवजी स्वत: माहिती घेण्याची तयारी दर्शविली म्हणून टपालाचा खर्च वगळून माहितीचे शुल्क रु.२/- चा भरणा करणे बाबत कळविले त्यांनी शुल्क भरले म्हणून दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस तळेगाव ते दुर्गवाडा रस्त्यावर दुपदरीचे काम करण्यात आले नाही, त्यामुळे कामामध्ये बाधा ठरणारी बाभळीची झाडे तोडण्यात आली नाहीत असे कळविलेले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी

सांगितले. त्यामुळे झाडे तोडण्याचा प्रश्न उद्‌भवला नाही मात्र त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तळेगाव ते दुर्गवाडा या रस्त्याचे रुंदीकरण सन २००७ मध्ये झाले आहे त्याबाबतची त्यांना माहिती आवश्यक आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी याबाबत असा खुलासा केला की, सदरच्या रस्त्याचे दुपदरीकरणाचे काम झालेले नाही मात्र सदरच्या रस्त्याचे दीडपदरी करणाचे काम झालेले आहे. मात्र अपीलार्थीने दुपदरीकरणाची माहिती मागितली आहे म्हणून त्याप्रमाणे अपीलार्थीस दुपदरीकरणाचे काम झालेले नाही असे कळविले असल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, तळेगाव ते दुर्गवाडा या रस्त्याचे दुपदरीचे काम झालेले नाही मात्र सदरच्या रस्त्याचे दीडपदरी काम झालेले आहे. म्हणून अपीलार्थीस सदर रस्त्याचे दीडपदरी करणाच्या कामाबाबत कळविणे संयुक्तिक होईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी सदर रस्त्याच्या दीडपदरीकरणाची माहिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२७९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री नानाजी जैदास रामटेके<br>रा. जानबा, पो. इटखेडा<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्ध**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>सत्र न्यायालय भंडारा<br>ता. जि. भंडारा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>दिवाणी न्यायालय, अर्जुनी /मोर<br>ता. अर्जुनी/मोर. जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा न्यायालय भंडारा श्री साठवणे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, दिवाणी न्यायालय, अर्जुनी/मोर जि. गोंदिया यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०१/०२/२०१० रोजी कोर्टात दाखल झालेल्या त्यांच्या केस संबंधित माहिती

मागितलेली आहे. तसेच अपीलार्थीने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले दिसून येते. परंतू त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२१/०३/२०१० प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. १४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी, दिवाणी न्यायालय अर्जुनी/मोर जि. गोंदिया यांचेकडे अर्ज करुन माझी केसची तारीख दि. २१/०१/२०१० रोजी होती परंतू मी ग्रामीण रुग्णालयात अर्जुनी/मोर येथे प्रकृती ठीक नसल्यामुळे भरती होतो परंतू दि. २१/०१/२०१० ला श्री भगत पोलीस यांचे न्यायालयात बयान झालेला असल्यास त्या बयानाच्या नक्कलची प्रत आणि तारखेवर हजर न झाल्यास पुढील तारीख मागितली होती त्या पत्राची प्रत मिळणेबाबत माहिती मागितलेली आहे. परंतू त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी कोर्ट विदयमान साहेब यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय भंडारा श्री साठवणे हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०१/०२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही त्यामुळे अपीलार्थीने मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर अर्जुनी/मोर येथे जनमाहिती अधिकारी हे पद नाही या कार्यालयाचे जनमाहिी अधिकारी म्हणून प्रबंधक जिल्हा न्यायालय गोंदिया हे आहेत. कारण तयांची जनमाहिती अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने माहितीचा अर्ज प्रबंधक तथा जनमाहिती अधिकारी जिल्हा न्यायालय गोंदिया यांचेकडे करणे आवश्यक होते. कारण अर्जुनी/मोर न्यायालयाचे संदर्भात फेब्रुवारी २०११ पासून प्रबंधक जिल्हा न्यायालय गोंदिया हे जनमाहिती अधिकारी म्हणून काम करीत आहेत.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय भंडारा श्री साठवणे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात अर्जुनी/मोर येथे न्यायालयात जनमाहिती अधिकारी नसून फेब्रुवारी २०११ पासून अर्जुनी/मोर न्यायालयाचे जनमाहिती अधिकारी हे प्रबंधक जिल्हा न्यायालय गोंदिया हे कार्यरत आहेत म्हणून अपीलार्थीचा माहितीचा अर्ज आयोगासमोर अपीलार्थीने प्रबंधक तथा जनमाहिती अधिकारी जिल्हा न्यायालय भंडारा यांचेकडे दिला म्हणून जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय भंडारा यांनी अपीलार्थीचा दि. ०१/०२/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय गोंदिया यांचेकडे त्वरीत पाठवावा आणि त्यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती नियमाप्रमाणे उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करावी असे देखील कळवावे. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय भंडारा यांनी अपीलार्थीचा दि.०१/०२/२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा प्रबंधक जिल्हा न्यायालय गोंदिया यांचेकडे अपीलार्थीस माहिती प्राप्त होण्यासाठी पाठवावा. आणि त्याची प्रत अपीलार्थीस त्वरीत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रत प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२७८/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>२७०, चंदननगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर -९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक पोलीस निरीक्षक<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नागपूर परिक्षेत्र नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालय, नागपूर परिक्षेत्र नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०१/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०१/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी विशेष पोलीस महानिरिक्षक, कार्यालय नागपूर श्री कांबळे, कार्यालय अधिक्षक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा वाचक, पोलीस निरिक्षक, विशेष पोलीस माहनिरीक्षक कार्यालय नागपूर श्री मसराम हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालय नागपूर परिक्षेत्र नागपूर यांचे कार्यालयाकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२२/१२/२०१० रोजी पोलीस आयुक्त यांचेकडील

दि.०४/११/२०१० चे पत्रानुसार लघुलेखक वामन बाबुराव तितरमारे व इतर ३ यांनी संगणमत करुन कार्यालयाचा दुरुपयोग केल्याचे आक्षेप सिध्द होवून त्यांचेवर कार्यवाही करुन शिक्षा देणे बाबतच्या पत्रावर आपले कार्यालयाकडून सदर व्यक्तीवर केलेल्या कार्यवाहीची एकूण ३ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यांना जनमहिती अधिकारी यांचेकडून दि. ०६/०१/२०११ च्या पत्रान्वये माहिती प्राप्त झाली परंतू उपलब्ध झालेली माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना समाधानकारक माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी श्री वामन बापुरावजी तितरमारे लघुलेखक पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जि ग्रामिण यांचे विरुध्द केलेल्या तक्रारीच्या संदर्भात काय कार्यवाही केली अशी माहिती मागितली होती. परंतू वस्तुनिष्ठ माहिती पुरविण्याचे कुठलेली प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही तसेच मुद्या क्र.१ ची माहिती फक्त २३-१२-२०१० ला चौकशी अहवाल पुढील कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त यांना पाठविण्यात आला आहे असे कळविले आहे आणि मुद्या क्र. २ च्या माहिती बाबत असे कळविले की, सदरची तक्रार दि.०१/०१/२०११ ला पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण यांनी त्यांना दि.०६/०१/२०११ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा कार्यालयीन अधिक्षक श्री कांबळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २२/१२/२०१० चा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि.०६/०१/२०११ च्या पत्रान्वये १ ते ३ मुद्यांची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र मुद्या क्र. १ च्या संदर्भात दि. २३/१२/२०१० च्या पत्रान्वये चौकशी अहवालावरील पुढील कार्यवाहीसाठी पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचेकडे पाठविण्यात आले आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्याचे अपीलार्थीने सांगितले. म्हणून दि. २३/१२/२०१० च्या पत्राची

प्रत त्यांना देणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्र. २ बाबत पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण यांनी त्यांचा दि.०४/१२/२०१० चा अर्ज ज्या अधिकाऱ्याकडे चौकशीसाठी दिलेला आहे त्याची माहिती त्यांना मिळावी असे अपीलार्थीने सांगितले.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/०१/११ च्या पत्रान्वये १ ते ३ मुद्यांची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलार्थीस वर नमूद केल्याप्रमाणे दि. २३/१२/२०१० च्या पत्राची प्रत आणि पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण त्यांनी अपीलार्थीचा दि. ०४/१२/२०१० चा अर्ज चौकशीसाठी ज्या अधिकाऱ्याकडे दिला आहे त्याची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलार्थीस दि.२३/१२/२०१० च्या पत्राची प्रत आणि अपीलार्थीचा दि. ०४/१२/२०१० चा अर्ज पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामिण यांनी ज्या अधिकाऱ्यकडे चौकशीसाठी दिलेला आहे त्याबाबतची माहिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२८७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | डॉ आनंद कुमार<br>एस-२०२, साई - ललिथा अपार्टमेंट, ०२ मन्नेवार कॉलनी, अनंतर नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर -४४००१३ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक<br>सहकारी संस्था, नागपूर<br>धनवटे चेंबर्स, अनेक्स, सिताबर्डी, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, (शहर-१) नागपूर<br>भांडे प्लॉट, १८५ आयुर्वेदिक ले आऊट, उमरेड रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०२/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था (शहर-१) नागपूर श्री धाबेराव हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर तर्फे श्री संजय कदम विभागीय उपनिबंधक हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील दि. २७/०८/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, १८५, आयुर्वेदिक ले आऊट, भांडे प्लॉट उमरेड रोड यांचेकडे सेंट्रल ग्राऊंड वॉटर

बोर्ड (CR) एम्प्लॉईज क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड बाबत १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. मात्र त्यांना संस्थेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी विभागीय सहनिबंधक नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षित असलेली माहिती पुरविलेली नाही त्यामुळे दि.१५/११/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी, यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील फेटाळण्यात आल्यामुळे यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले असे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपनिबंधक श्री दाबेराव हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड को.ऑपरटिव्ह सोसायटी या संस्थेशी संबंधित असून अपीलार्थीचा माहितीचा अर्ज दि. ०९/०९/२०१० रोजी संस्थेचे अध्यक्ष व सचिव यांचेकडे वर्ग करुन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले व त्याची प्रत अपीलार्थीस देऊन अपीलार्थीने संस्थेशी संपर्क साधून माहिती प्राप्त करुन घ्यावे असे कळविले होते. तथापी सदरच्या संस्थेकडून अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीने विभागीय सहनिबंधक यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी हे उपनिबंधक नागपूर शहर १ हे असल्यामुळे विभागीय सहनिबंधक यांनी अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळले असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री संजय कदम यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने सेंट्रल ग्राऊंड वॉटर बोर्ड को.ऑपरटिव्ह सोसायटी या संस्थेशी संबंधित माहिती मागितली आहे परंतू सदर संस्थेस कोणतेही शासकीय अनुदान किंवा वित्तीय सहाय्य प्राप्त झाले नाही. तथापी तसेच सदर संस्था ही महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार नोंदणीकृत झालेली असून

सदर संस्थेवर वैधानिक नियंत्रण म्हणून उपनिबंधकांनी सहकारी कायद्यातील तरतुदी नुसार अपीलकर्त्याने मागितलेली माहिती संस्थेकडून प्राप्त करुन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांत उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर शहर १ यांनी सहकारी कायदयातील तरतुदीनुसार सदर संस्थेकडून माहिती प्राप्त करुन अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.२८६/नाग/२०११**

१. श्री देवीदास जग्गनाथ जोशी - **अपीलकर्ता**
रा. गाळा क्र. यु-०९/लक्ष्मी विहार, ईमारत क्र.२ वर्धा रोड, सोमलवाडा, नागपूर
ता. जि. नागपूर -२५

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक - **उत्तरवादी**
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक - **उत्तरवादी**
ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक ०२/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १५/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०२/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर श्री टि. के. राय हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली दि.१९/११/२०१० च्या अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक अँटी करप्शन ब्युरो नागपूर यांचेकडे श्री अनिल बोबडे तात्कालीन Dy. S.P. A.C.B. नागपूर यांनी दि. ३०/०९/२००० रोजी आणि ०१/१०/२०१० रोजी त्यांचे निवास स्थानातून कार्यकारी अभियंता, लघुसिंचन विभाग जिल्हा परिषद नागपूर यांना गोप. पत्र क्र. १८ / दि.२८/०८/२००० मुखपृष्ठ पत्रासह जप्त केलेले मुळ स्वरुपातील एकूण ७४ सिमेंट Indents च्या सत्यप्रती पुरविण्यात यावी अशी माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि.१५/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आजच्या सुनावणीस जनमहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो नागपूर श्री टी. के. रॉय हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.१९/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२०/११/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी दि.०७/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस असे कळविले की, दि. ३०/०९/२०१० रोजी श्री अनिल बोबडे तात्कालीन पोलीस उप अधिक्षक, अँटी करप्शन ब्युरो यांनी आपल्या निवासस्थातून घर झडती दरम्यान वेगळया जप्ती पत्रका प्रमाणे जप्ती केलेले सर्व दस्तऐवज मा. विशेष न्यायालय लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय नागपूर येथे विशेष खटला क्र. ७/०२ मध्ये व्ही. पी. क्र.१७/०२ व जी. पी. क्र.६४/०२ दि.०८/०२/०२ नुसार जमा करण्यात आले आहेत. आपण मागणी केलेले दस्तऐवज कार्यालयातील दस्तऐवजा मध्ये उपलब्ध नाही त्याबाबत मा. न्यायालयात अर्ज करुन आपण दस्तऐवज हस्तगत करावे असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविलेले असल्याचे सांगितले. मात्र प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांना श्री अनिल बोबडे यांनी जप्त केलेल्या सिमेंटच्या संदर्भातील ७४ मुळ indents यांच्या सत्यप्रती त्यांना हव्या आहेत म्हणून याबाबत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की, अपीलार्थीला ७४ सिमेंट Indent च्या सत्यप्रती पाहिजे असल्यामुळे तात्कालीन सहायक पोलीस आयुक्त श्री अनिल बोबडे यांना दि. २०/०१/२०११ रोजी पत्र लिहून असे कळविले की,

अपराध क्र.३०६४/२००० लाचलुचपत प्रतिबंध (लाप्रक) अन्वये दाखल केलेल्या गुन्ह्यातील आरोपी यांचेकडून ७४ सिमेंट indents जप्त केले किंवा कसे याबाबत विचारणा केली होती त्यावर तात्कालीन सहायक पोलीस आयुक्त अनिल बोबडे यांनी त्यांचे दि. २४/०१/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, पोलीस स्टेशन अंबाझरी नागपूर शहर अपराध क्र. ३०६४/२००० कलम ७ दि.१३ (१) १३ (२) लाचलुचपत प्रतिबंध कायदा १९८८ अन्वये गुन्ह्यातील दाखल आरोपी यांचेकडून जप्त केलेले मुद्येमाल न्यायालयात सुखरुप केलेले आहेत. यावरुन असे दिसून येते की, श्री अनिल बोबडे यांनी अपीलार्थीकडून जी कागदपत्रे जप्त केलेली आहेत प्रती न्यायालयात जमा केलेली आहेत म्हणून श्री अनिल बोबडे यांचेकडली दि.२४/०१/२०११ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे न्यायोचित होईल. म्हणून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांत विद्यमान जनमहिती अधिकारी, यांनी अपीलार्थीस तात्कालीन सहायक पोलीस आयुक्त श्री अनिल बोबडे यांचेकडील दि. २४/०१/२०११ च्या पत्राची प्रत विनामुल्य व्यकतीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२९३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री खुशाल विश्वनाथ ठलाल<br>ब्लॉक नं. एसएफ ८/२, उर्जानगर, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर-४४२४०४ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>उपसंचालक (नाहस) समाज कल्याण संचालनालय, पुणे<br>ता. जि. पुणे-१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>समाज कल्याण संचालनालय, पुणे<br>ता. जि. पुणे -१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी, संचालक, समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे माहिती अधिकाराखाली दि. २५/१०/२०१० च्या अर्जान्वये दलित मित्र पुरस्कार संदर्भातील २००८-०९ या वर्षातील दिलेल्या पुरस्कारासंबंधित माहिती मागितलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.०७/०१/२०११ रोजी प्रथम अपील संचालक, समाज कल्याण कार्यालय

पूणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, श्री जीवन मोगरे यांना २००८-२००९ चा दलीतमित्र पुरस्कार प्रदान केला त्या फॉर्म प्रस्तावाची झेरॉक्स प्रत, त्याचसंदर्भातील समाज कल्याण अधिकारी / जिल्हाधिकारी यांनी शिफारस केल्याची झेरॉक्स प्रत, पोलीस चारित्र्य सत्यापन पत्राची झेरॉक्स प्रत श्री श्रीराम पान्हेरकर यांना पुरस्कार का नाकारला याची माहिती तसेच श्री पान्हेकर यांना पुरस्काराकरिता निवडु नये म्हणून चंद्रपुरातील महिला, पुरुषाची सामाजिक न्याय विभागाला आलेली दि. २५/०२/२०१० चे पत्राची झेरॉक्स प्रत अशी माहिती जनमाहिती अधिकारी, कार्यालय संचालक समाज कल्याण पुणे यांचेकडे मागितली होती परंतू विहीत मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. ०७/०१/२०११ रोजी प्रथम अपीलीय अधिकारी समाजकल्याण संचालनालय पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्ता यांनी सांगितले.

४. आज आयोगापुढे सुनावणीकरिता जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी समाज कल्याण संचालनालय पुणे हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच उत्तरवादी यांना आयोगापुढे सुनावणीस उपस्थित राहण्याकरिता दि. ०५/०५/२०११ च्या नोटीसद्वारे कळविण्यात आले होते तथापी ते सुनावणीस गैरहजर राहिले किंवा त्यांनी गैरहजेरीबद्यल आयोगाकडे काही कळविले देखील नाही म्हणून जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये शास्तीची कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत आयोगाकडे सादर करावा. तसेच अपीलार्थीने त्यांच्याकडील दि.२५/१०/२०१० च्या अर्जात मागितलेली माहिती अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमहिती अधिकारी, यांनी अपीलार्थीस त्यांचेकडील दि.२५/१०/२०१० च्या माहिती अर्जातील माहिती विनामुल्य व्यकतीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी हे दोघेही आज आयोगापुढे सुनावणीस हजर झाले नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये योग्य ती कार्यवाही का करु नये याचा लेखी खुलासा त्यांनी हा आदेश मिळाल्यापासून १५ दिवसात आयोगाकडे सादर करावा. अन्यथा त्यांचेविरुध्द योग्य ती कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे संचालक समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक.....................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.२९९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती मनिषा हिरामण सोनवाने<br>तिवारी कॉलनी, गुरुनानक वार्ड, गणेश नगर, गोंदिया<br>ता. जि. चंद्रपूर-४४२ ४०४ | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकार तथा कृषि सहसंचालक (आस्थापना)<br>कृषी आयुक्तालय, पुणे<br>साखर संकूल पूणे-५ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक (कक)<br>कृषी आयुक्तालय, पुणे<br>मध्यवर्ती इमारत, पूणे-१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०३/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २५/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०३/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी कृषी सहसंचालनालय (आस्थापना) कृषी आयुक्तालय, पुणे यांचे वतीने श्री एस. के. साने कृषी अधिकारी, कृषी आयुक्तालय पुणे हे हजर आहेत.

२.	आजच्या सुनावणीस अपीलकर्ती आयोगापुढे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ती यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१५/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, जिल्हा कृषी अधिक्षक कार्यालय गोंदिया तील गड 'ड' पद शिपाई भरती वर्ष २०१० बद्यल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली आहे. अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमूद केले असून माहिती टपालाद्वारे घेणार असे नमूद केले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतू अपीलार्थीचे समाधान  झाले नाही म्हणून अपीलार्थीने दि.१७/१०/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२७/१२/२०१० रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले आहे. त्यामुळे अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीच अपील दाखल केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री एस. के. साने कृषी अधिकारी, कृषी आयुक्तालय पुणे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १५/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०४/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या माहितीच्या अर्जात जिल्हा अधिक्षक, कृषी अधिकारी गोंदिया येथील गट 'ड' पद शिपाई भरती वर्ष २०१० बद्यल केलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्या माहितीमध्ये असे नमूद केले की, या तक्रारीच्या संदर्भात कृषी आयुक्तालयास  एकूण ३ तक्रार अर्ज प्राप्त झाले होते. संदर्भीय तक्रार अर्जाच्या अनुषंगाने कृषी आयुक्तालयाच्या स्तरावरुन प्राथमिक चौकशीसाठी दि.१७/०८/२०१० अन्वये द्विसदसीय समिती नियुक्त केली आहे त्यांचे स्तरावरुन कार्यवाही चालू आहे आणि त्यासोबत द्विसदसीय चौकशी समिती नियुक्तीच्या दि.१७/०८/२०१० च्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. याप्रमाणे अपीलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दि.०६/११/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिल्याचे श्री साने यांनी आयोगापुढे सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील कृषी सहसंचालक (आस्थापना) कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे दाखल केले. त्याची सुनावणी घेण्यात आली मात्र अपीलार्थी गैरहजर होत्या परंतू

जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेऊन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे प्रथम अपील अमान्य केले असे श्री साने यांनी सांगितले.

४. श्री साने यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, त्यानंतर द्विसदसीय समितीचा प्राथमिक चौकशी अहवाल कृषी आयुक्तालयाकडे प्राप्त झाला असून त्याची प्रत कार्यवाहीसाठी शासनास दि.१०/०२/२०११ रोजी पाठविलेली आहे त्यानंतर कृषी आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पूणे यांचेकडून दि.०६/०४/२०११ च्या पत्रान्वये संबंधितांविरुध्द विभागीय चौकशी सुरु करण्यासंदर्भात आवश्यक ती माहिती पाठविलेली आहे.

५. जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दि. ०६/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३०७/नाग/२०११</u>**

१. श्री विजय केशवराव चन्ने - **अपीलकर्ता**
रा. मस्जिद जवळ, गांधी चौक, राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी - **उत्तरवादी**
नगर परिषद राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
नगर परिषद राजुरा
ता. राजुरा जि. चंद्रपूर

## (आदेश पारित दिनांक ०४/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. १७/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०५/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०४/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी, नगर परिषद राजुरा श्री प्रभाकर रायपुरे सहायक निरिक्षक नगर पालिका राजुरा हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद राजुरा यांच्या तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

२. आज सुनावणीस आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. परंतू उपलब्ध असलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दि.१६/११/२०१० रोजी

माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन जनमाहिती अधिकारी, नगर परिषद राजुरा यांचेकडे सर्वे नं. १४८/१ मध्ये असिफाबाद रोड लगत सुपर मार्केट या नावाची नगर परिषदेने कमर्शियल कॉम्प्लेक्स बांधलेली आहे, सदरहू कॉम्प्लेक्स बांधण्यापूर्वी नगर परिषद राजुरा यांनी सर्वे नं १४८/१ पैकी मधील जागा खरेदी केल्याबाबतचे दस्तऐवजांचे प्रति मिळण्याबाबत तसेच नगर रचनाकार चंद्रपूर यांचेकडून सुपर मार्केट या नावाची इमारत बांधकाम करण्याबाबतचा नकाश मंजुर घेतला असल्यास त्या नकाशाची प्रमाणित प्रत, सदरहू कॉम्प्लेक्स बांधकामाकरिता एकुण किती खर्च आला व कोणत्या फंडातून नगर परिषदेने सुपर मार्केट या इमारतीचे बांधकाम केले आहे. त्याचे हिशोब याप्रकारची माहिती मागितलेली दिसते.

३. जनमाहिती अधिकारी श्री प्रभाकर रायपुरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता त्यामध्ये अपीलार्थीने मौजा राजुरा येथील सर्वे नं. १४८/१ मध्ये नगर सुपरमार्केटच्या बांधकामाबाबतची माहिती मागितली होती. त्यानुसार माहितीचा शोध घेण्यात आला परंतू अपीलार्थीने सुपरमार्केटच्या जागा खरेदीबाबतच्या दस्तऐवजांची मागणी केली होती ती जागा नगर परिषदेने खाजगी व्यक्तीकडून सुमारे ३० ते ३५ वर्षापूर्वीच खरेदी केल्याने त्याच्या संबंधित दस्तऐवजांचा शोध घेऊनही सदर माहिती उपलब्ध झाली नाही. मात्र नगर परिषेदेकडे खरेदी खताची प्रत उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी दि. २९/११/२०१० रोजी सहा. निबंधक राजुरा नोंदणी कार्यालय यांचेकडे या खरेदीखताची प्रत मागितली पुन्हा दि. ०३/१२/२०१० रोजी त्यांना स्मरणपत्र देण्यात आले आणि त्यानंतर अपीलार्थीस दि. ०३/१२/२०१० च्या पत्रान्वये १ ते ३ या मुद्यांची माहिती कळविण्यात आले आणि त्यामध्ये मुद्या क्र. १ च्या संदर्भात सदर जागा खरेदी केल्याचे दस्तऐवज नगर परिषदेच्या कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे सबरजिस्टर कार्यालय राजुरा यांचेकडून घेण्यात यावे असे कळविण्यात आले. तसेच क्र. २ बाबत असे नमुद करण्यात आले की, सुपर मार्केट बांधकाम करण्यात आले असून त्याबाबतचा बांधकाम नकाशा उपलब्ध नाही आणि मुद्या क्र. ३ बाबत सदरच्या इमारतीच्या बांधकामाचा खर्च रु. ३८७०५३/- इतकरा झाला असल्याची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलार्थीस दि. ०३/१२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असून सदरची माहिती शिपायामार्फत अपीलार्थीकडे पाठविण्यात आली होती. मात्र अपीलार्थीने ती माहिती स्विकारली नाही. म्हणून दि. ०९/१२/२०१०

च्या पत्रान्वये अपीलार्थीस डाक नोंदणीने सदर माहिती पाठविलेली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने दि.१८/१०/२०१० च्या पत्रान्वये प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपीलाचा अर्ज दि.२०/१२/२०१० ला प्राप्त झाला. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील आणि त्यावर दि. १४/०१/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यावेळी अपीलकर्ता हजर होते. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १८/०१/२०११ रोजी देण्यात आला आणि त्यामध्ये सब रजिस्टार यांनी सुपरमार्केटची जागा खरेदी केलेल्या दस्तऐवजांचा शोध घेऊन अपीलार्थीस कळवावे असे नमूद केले. त्यानंतर दुय्यम निबंधक राजुरा यांनी तहसिलदार राजुरा यांना कळविले की, नगर परिषदेने श्री सुरेशराव देशपांडे यांचेकडून सुपरमार्केट असलेली जागा सन १९६५ ते १९८५ च्या दरम्यान खरेदी केलेली असून त्या रजिस्ट्रच्या प्रतची नगर परिषदेला आवश्यकता होती. परंतू १९६५ ते १९८५ या वर्षात सदर रजिस्ट्रिचा शोध घेतला असता त्याची नोंद आढळून आलेली नाही असे दुय्यम निबंधक राजुरा यांनी कळविल्याचे दिसून येते. त्या पत्राची प्रत जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा अपीलार्थीस दि.२५/०१/२०११ च्या पत्रान्वे उपलब्ध करुन दिलेली आहे.

४. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०३/१२/२०१० च्या पत्रान्वये आणि दि. २५/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३१२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामकिशोर गणेशलाल नागवंशी<br>रा. पो. डोंगरगांव (पारडीबांध)तिरोडा रोड<br>ता. जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त<br>महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे<br>१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे-१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०६/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १८/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपआयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद, पुणे श्री एस. एस. पांढरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांनाच प्राधिकृत केले आहे.

२.  अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २३/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उप आयुक्त, महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचेकडे सन १९८२ ते १९८६ या कालावधीतील श्री मदनलाल जोशीराव डोहरी यांचे डी. एड. प्रशिक्षणाबाबतची माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. १०/०८/२०१० च्या पत्रान्वये त्रयस्थ पक्षाची माहिती मागितलेली असल्यामुळे देता येत नाही असे अपीलार्थीस कळविले आहे त्यामुळे अपीलार्थीने दि. ०६/०९/२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा आयुक्त महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.२२/१०/२०१० रोजी निर्गमित केलेला असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती योग्य असल्याचे नमूद करुन अपीलार्थीस कळविलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.  अपीलकर्ता यांनी  आयोगापुढे सांगितले की, श्री मदनलाल व जोशीसाव डोहरी यांनी शिक्षणशास्त्र पदविका सन १९८४ एप्रिल मध्ये उत्तिर्ण केले असून आपल्या कार्यालयात उपलब्ध असलेल्या गुणांच्या नोंदणी रजिस्टरमधील बैठक क्रमांक १३५९ केंद्र क्रमांक ७७०१ चे संबंधित व्यक्तीच्या गुणांची गुणपत्रिकांची प्रमाणित प्रत अथवा गुण नोंदणी रजिस्टरमधील संबंधित बैठक क्रमांक १६५९ समोर नोंदणी केलेल्या गुणांच्या उत्तर पत्रिकेची प्रत अशी  माहिती जनमाहिती अधिकारी तथा उपायुक्त यांचेकडे मागितली होती. त्यासाठी शुल्क भरण्यास तयार आहे असे अपीलार्थीने सांगितले. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलार्थीने सांगितले.

४.  जनमाहिती अधिकारी तथा उपायुक्त श्री पांढरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहिती अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (त्र) प्रमाणे त्रयस्थ व्यक्तीची माहिती देता येत नाही असे अपीलार्थीस दि. १०/०८/२०१० रोजी तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी कळविले आहे. तसेच परिक्षेच्या निकालानंतर गुणपत्रिका संबंधित उमेदवारास दिली जाते. परिषदेकडे त्याची द्वितीय प्रत असत नाही व स्थळप्रत सुध्दा असत

नाही. त्यामुळे त्याची प्रमाणित प्रत व स्थळप्रत देता येणार नाही असेही तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले असल्याचे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाच्या सुनावणीस अपीलार्थी हे गैरहजर राहिले म्हणून एकतर्फी निर्णय घेऊन सदरचे प्रथम अपील फेटाळण्यात आले त्यामुळे अपीलार्थीस माहिती देता आली नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, श्री मदनलाल जोशीसाव डोहरी यांनी एप्रिल १९८४ मध्ये शिक्षण शास्त्र पदवीका पास केल्याबाबतच्या गुण पत्रिकेची माहिती मागितली असून सदर माहिती ही सुमारे २० वर्षापूर्वीची आहे मात्र माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१) (त्र) प्रमाणे गुण पत्रिका उपलब्ध करुन देता येत नाही हे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य व संयुक्तिक नाही. म्हणून अपीलार्थीस त्यांनी मागितलेल्या गुणपत्रिकेची प्रमाणित प्रत किंवा गुणनोंदणीच्या रजिस्टरमधील प्रमाणित प्रतचा कसून शोध घेऊन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे न्यायोचित आणि योग्य होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांनी मागितलेल्या माहिती बाबत त्यांच्या कार्यालयात कसून शोध घ्यावा आणि त्यानंतर माहिती उपलब्ध झाल्यास अपीलार्थीस विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी. आणि माहितीचा शोध घेऊनही माहिती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

P.T.O.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३१०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>२७०, चंदन नगर, पो. हनुमान नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर-९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक ०६/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर श्री एस. एस. कुदरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय श्री एम. एल. गुर्जर हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २०/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन), पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दि. १२/१०/२०१० नुसार

तात्कालीन सहा. पोलीस आयुक्त श्री खरात यांचा लेखी अहवाल दिला त्यानुसार तात्कालीन लघुलेखक श्री वामन बापुराव तितरमारे हे दोषी असल्यामुळे त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही आयुक्त कार्यालयात करता येत नाही या बदल १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि.२०/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे परंतू दिलेल्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि.२२/११/२०१० रोजी उपआयुक्त (मुख्यालय) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा अर्ज निकाली काढण्यात आल्यामुळे अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांचेकडे श्री वामन बापुराव तितरमारे, लघुलेखक यांचेबाबतची ६ मुद्यांवर माहिती मागितलेली होती. जनमाहिती अधिकारी यांचेकडून वस्तुनिष्ठ माहिती मिळाली नाही तसेच पुरविलेल्या माहितीमध्ये बऱ्याच त्रुटी आहेत आणि दिशाभूल करणारी माहिती दिली असल्यामुळे त्यांनी पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून माहिती कायदयाचे पालन केले जात नाही त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यांवर कठोर कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२०/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस १ ते ६ मुद्यांवर माहिती देण्यात आली मात्र अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी उपायुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले त्याची सुनावणी घेण्यात आली त्यानंतर अपीलकर्त्यास दि.२१/१२/२०१० च्या पत्रान्वये मुद्या क्र.२ ची सध्यस्थितीची माहिती देण्यात आली. मात्र सदर माहितीने देखील अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले. त्यावर अपीलार्थीने प्रामुख्याने असे सांगितले की, तात्कालीन लघुलेखक श्री वामन बाबुराव तितरमारे हे सहा. पोलीस आयुक्त श्री खरात यांनी केलेल्या चौकशी अहवालावरुन दोषी आढळून आले आहेत. मात्र त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर दि. २१/१२/२०१०

च्या पत्रान्वये मुद्या क्र. २ बाबत चौकशी सुरु असल्यामुळे चौकशी पूर्ण होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल अशी माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपआयुक्त (मुख्यालय) श्री गुर्जर यांनी आयोगापुढे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, तात्कालीन लघुलेखक श्री वामन बाबुराव तितरमारे यांचेविरुध्द करावयाच्या कार्यवाही बाबतचा प्रस्ताव पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे सादर झाला आहे. मात्र दरम्यानच्या काळात सौ प्रिती तितरमारे यांनी पोलीस आयुक्त नागपूर यांचेकडे तक्रार अर्ज सादर केला. त्यामुळे पोलीस आयुक्त काया्रलयाने श्री विजयकुमार शामदेव तितरमारे यांनी केलेल्या तक्रार अर्जावर पुन्हा नव्याने चौकशी करण्याचे प्रस्तावीत केले आणि सदर प्रकरणी नव्याने चौकशी करुन सुस्पष्ट चौकशी अहवाल दि.१६/०५/२०११ च्या पत्रान्वये श्री उंबरकर सहायक पोलीस आयुक्त यांना सादर करण्याचे निर्देश दिले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी श्री उंबरकर यांचा चौकशी अहवाल प्राप्त झ ााल्यानंतर पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडून पुढील कार्यवाही करण्यात येईल असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. तसेच प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करण्यास जास्त विलंब झाला आहे असे अपीलार्थीचे म्हणणे आहे म्हणून या प्रकरणात पुन्हा नव्याने चौकशी अहवाल प्राप्त करण्यास किती अवधी लागेल या बाबत आयोगाकडून विचारणा केली असता सुमारे एक महिन्याचा कालावधी लागेल असे माहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, श्री उंबरकर सहायक पोलीस आयुक्त यांचेकडून या प्रकरणात फेरचौकशी अहवाल एक महिन्याच्या मुदतीत प्राप्त करुन घेऊन त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून आयोगापुढे आज झालेल्या सुनावणीचा संदर्भ देऊन श्री उंबरकर यांचेकडून फेरचौकशी अहवाल प्राप्त करुन घेऊन केलेल्या चौकशीचा अहवाल अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे योग्य राहील. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी श्री उंबरकर यांचेकडून एक महिन्याचे मुदतीत फेरचौकशी अहवाल प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करावी आणि फेरचौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस एक महिन्याच्या मुदतीत उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३१७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्रीमती चंद्रकला सुभाष वर्मा<br>वाजपेयी मंदिर जवळ, लोधीपुरा, बजेरीया, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **अपीलकर्ती** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय)<br>नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय, पुणे<br>नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन जवळ, पुणे-१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक<br>नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक कार्यालय, पुणे<br>नविन प्रशासकीय इमारत, विधान भवन जवळ, पुणे-१ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०११)**

१. अपीलकर्ती यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलार्थी हजर असून त्यांच्या तर्फे ॲड. ए. आर. यादव हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. नोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, पुणे श्री एम. एस. जावळे सहायक नोंदणी महानिरीक्षक हे उपस्थित आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, कार्यालय पुणे यांचे तर्फे नोंदणी उपमहानिरीक्षक नागपूर विभाग नागपूर श्री म. तु. केदार उपस्थित आहेत.

२. अपीलकर्ती यांचे वतीने ॲड. ए. आर. यादव यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने दि.२८/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. नोंदणी महानिरीक्षक, महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, नवीन प्रशासकीय इमारत, विधान भवन पुणे यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्यांनी दि.२९/०९/२००९ रोजी दिलेल्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. २६/०८/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले आहे की, आपला तक्रार अर्ज दि.३१/१०/२००९ च्या पत्रान्वये नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक नागपूर विभाग नागपूर यांना नियमानुसार योग्य ती चौकशी करुन वस्तुस्थितीदर्शक अहवाल या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे त्याबाबतचा अहवाल प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. मात्र त्याबाबत अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपनोंदणी महानिरीक्षक (मुख्यालय) पुणे यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. २५/०१/२०१० रोजी देण्यात आला. त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या तक्रार अर्जाविषयी सद्यस्थितीची माहिती दिलेली आहे. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी सदरचा चौकशी अहवाल लवकरात लवकर प्राप्त होण्यासाठी त्यावर कार्यवाही करावी असे नमूद करुन अपीलार्थीस कळविले आहे. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयाने त्यांचे समाधान झाले नाही म्हणुन त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सहा. नोंदणी महानिरीक्षक पुणे श्री एम. एस. जावळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २८/०७/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने त्यांच्याकडील दि. २९/०९/२००९ च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितली होती. अपीलार्थीचा दि.२९/०९/२००९ चा तक्रार अर्ज दि.३१/१०/२००९ च्या पत्रान्वये चौकशीसाठी नोंदणी उप महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक नागपूर विभाग नागपूर यांचेकडे पाठविलेला आहे. तथापी चौकशी अहवाल प्राप्त झाला नाही म्हणून त्यांच्याकडून चौकशी अहवालाची प्रत प्राप्त झाल्यानंतर आपणास माहिती उपलब्ध करुन देता येईल असे अपीलार्थीस दि.२६/०८/२०१० च्या पत्रान्वये कळविलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री केदार यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २९/०९/२००९ च्या तक्रार अर्जाचा चौकशी अहवालाची कार्यवाही सुरु आहे. नियमाप्रमाणे सदर अर्जाची चौकशी करण्यासाठी संबंधितांना

लेखी नोटीस पाठवून त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी कार्यवाही सुरु आहे सदरच्या तक्रार अर्जाची चौकशी सह. जिल्हा निबंधक नागपूर शहर यांचेमार्फत सुरु आहे आणि त्यांच्याकडून सदर चौकशीची कार्यवाही ६० दिवसात पूर्ण करुन घेण्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी निर्देश दिले आहेत. म्हणून त्याप्रमाणे कार्यवाही सुरु असल्याचे श्री केदार यांनी सांगितले.

४. अपीलकर्ती यांचे वकील तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी यांनी नमूद केल्याप्रमाणे अपीलार्थीचा दि.२९/०९/२००९ च्या तक्रार अर्जाच्या चौकशीची कार्यवाही ६० दिवसात पूर्ण करुन त्या चौकशी अहवालाप्रमाणे त्यावर पुढील कार्यवही करावी आणि केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. २९/०९/२००९ च्या तक्रार अर्जावर सह जिल्हा निबंधक नागपूर शहर यांचेकडून चौकशी पूर्ण करुन घेऊन अहवाल प्राप्त करण्याची कार्यवाही करावी. आणि चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर सदर तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३२०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री आर. डी. दहाट<br>श्री. जी. ए. बन्सोड, ६५ विवेकानंद नगर,<br>साईमंदिर मागे, वर्धा रोड, नागपूर-१५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक<br>नागपूर विभाग नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>शिक्षण उपसंचालक कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०७/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०७/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०७/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, शिक्षण उपसंचालक नागपूर कार्यालय श्री घुगे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक यांच्या तर्फे श्री घुगे यांनाच प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. २४/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांच्याकडे महाराष्ट्र शासन पत्र क्र. एन. आर. एन १६०९/८१३३ माशि-५ शलेय शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई -३२ दि.१३ एप्रिल २०१० च्या आदेशानुसार शिक्षण संचालक पुणे

यांना आपल्या कार्यालयाकडून पाठविलेला अभिप्राय (सविस्तर अहवाल) पत्राची प्रमाणित प्रत तात्काळ देवून माहिती देण्यात यावी. अशी माहिती मागितलेली आहे. त्यानुसार जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक यांनी अपीलार्थीस सदर माहितीकरिता एकूण १६ पानांकरिता प्रत्येकी रु.२/- प्रमाणे एकूण रु.३२/- लेखाशिर्षात जमा करण्याबाबत दि.३०/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविले आणि दि. ०५/०१/२०११ ला माहिती दिली परंतू सदर माहिती ही चुकीची असल्यामुळे दि.१०/०१/२०११ रोजी शिक्षण उपसंचालक यांचेकडे प्रथम अपील दाखल केलले दिसते. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि.२२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी शिक्षण उपसंचालक कार्यालय नागपूर यांचेकडे दि. १३ एप्रिल २०१० च्या आदेशानुसार शिक्षण संचालक पुणे यांना पाठविण्यात आलेल्या अभिप्रायाची प्रमाणित प्रत मागितली होती होती त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०५/०१/२०११ रोजी दुय्यम सेवा पुस्तकाची १६ पानांची अपूर्ण, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पाठविलेली आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. १०/०१/२०११ ला प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि.२७/०१/२०११ ला घेण्यात आली त्यादिवशी अपीलकर्ता हे हजर राहू शकले नाही तथापी त्यांना माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा लेखा अधिकारी, शिक्षण उपसंचालक नागपूर विभाग श्री घुगे हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि.०५/०१/२०११ च्या पत्रान्वये माहितीच्या एकूण १६ प्रती पाठविण्यात आल्या. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने मान्य केले. मात्र अपीलार्थीने आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पुन्हा शिक्षण संचालक, पुणे यांनी शिक्षण उपसंचालक नागपूर यांचेकडे दि. १५/०४/२०११ च्या पत्रान्वये काही मुद्यांवर स्पष्टीकरण मागितलेले आहे. त्या स्पष्टीकरणाचा अहवाल शिक्षण संचालक पुणे यांचेकडे सादर केला अगर कसे यांची माहिती त्यांना पाहिजे आहे त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, शिक्षण

संचालकांकडून शिक्षण उपसंचालक यांचेकडे दि. १५/०४/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीच्या संदर्भात काही मुद्यांवर स्पष्टीकरण मागितले होते. त्याला अनुसरुन शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी दि.१०/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ते स्पष्टीकरण शिक्षण संचालक पुणे यांचेकडे सादर केले आहे. त्या स्पष्टीकरणाची एक प्रत जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली ती अपीलार्थीने स्विकृत केली. यावरुन असे दिसून येते की, अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात शिक्षण उपसंचालक नागपूर यांनी शिक्षण संचालक पुणे यांचेकडे आवश्यक त्या स्पष्टीकरणाचा अहवाल दि. १०/०५/२०११ च्या पत्रान्वये सादर केलेला असल्यामुळे त्याची प्रत अपीलार्थीस आयोगापुढे प्राप्त करुन दिली म्हणून अपीलार्थीचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३२७/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संदीप प्र. देशपांडे (पत्रकार)<br>दै. लहूतरंग कार्यालय, दुर्गा चौक, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>तहसिल कार्यालय, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तहसिल कार्यालय, कामठी श्री सोनवाने हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांच्या तर्फे जनमाहिती अधिकारी श्री सोनवाने यानांच प्राधिकृत केले आहे.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. ०६/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, पुरवठा विभाग तहसिल कार्यालय, कामठी जि. नागपूर यांचेकडे कामठी तहसिलच्या हद्दीत सुरु असलेल्या

पेट्रोलपंपधारक, राशन दुकानधारक, घाऊक दाल मिलर्स, गहुमिलर्स, लहान मोठे कारखानदार यांचे फोन नं. मोबाईल नं. व पत्ते तसेस उपरोक्त लोकांचे पुरवठा विभागाशी कोणते काम असते ते विशद करुन वर्ष २००९ ते २०१० पर्यंत कोणकोणत्या स्वरुपाची कार्यवाही केली गेली इ. बाबत व पुरवठा अधिकाऱ्याबाबत १ ते ९ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे दि.२२/०२/२०११ रोजी द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तहसिल कार्यालय कामठी नागपूर यांचेकडे पेट्रोलपंपधारक, राशन दुकानधारक, घाऊक दाल मिलर्स, गहुमिलर्स, लहान मोठे कारखानदार यांचे फोन नं. मोबाईल नं. व पत्ते इ. बाबत माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झालेली माहिती चुकीची व अपूर्ण असल्यामुळे प्रथम अपील दाखल केले परंतू प्रथम अपीलाचा आदेश मिळाला नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करावे लागले.

४. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री सोनवाने हे उपस्थित आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार यांचे वतीनेही त्यांनाच प्राधिकृत करण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी श्री सोनवाने यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०६/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. ११/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही विस्तृत व मोठ्या स्वरुपात असल्यामुळे ती काढण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.१८/१०/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण कार्यालयात येऊन पाहिजे असलेल्या माहितीबाबत चर्चा करुन माहितीचे शुल्क भरणा करुन प्राप्त करुन घ्यावी तथापी अपीलकर्ता हे माहितीचे शुल्क भरण्यास आले नाही म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील तहसिलदार कामठी यांचेकडे दाखल केले. त्यावर दि. १०/०१/२०११ रोजी सुनावणी घेण्यात आली त्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला.

त्यानुसार अपीलार्थीने दि. १८/०१/२०१० ला माहितीचे शुल्क भरले आणि अपीलार्थीस दि. २०/०१/२०११ च्या पत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलार्थीस दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र त्यांना पुरवठा निरिक्षक यांचेवर झालेल्या कार्यवाहीच्या संदर्भात त्यांच्या सर्विसबुकची प्रत त्यांना मिळालेली नाही तसेच दिलेल्या माहितीमध्ये काही लोकांचे पत्ते, फोनं. नं. इत्यादीची माहिती त्यांना मिळालेली नाही असे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र पुरवठा निरिक्षकांच्या सर्विस बुकची प्रत आणि अपीलार्थीने मागितलेल्या व्यक्तींचे पत्ते व दुरध्वनी नंबर उपलब्ध असल्यास ते अपीलार्थीस देण्यात यावे किंवा पूर्वीचे पत्ते व फोनं. नं. जे दिलेले आहेत त्याशिवाय इतर माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आदेश**

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी पुरवठा निरिक्षकांच्या सर्विसबुकची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेले दुरध्वनी क्रमांक, पत्ते मोबाईल नंबर इत्यादीची माहिती जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध झाल्यास ती देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी. किंवा पूर्वी दिलेल्या पत्त्यांची माहिती फोनं. नंबरची माहिती व मोबाईल नंबरची माहिती जी माहिती दिलेली आहे त्याव्यतीरिक्त इतर माहिती उपलब्ध नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

३.    अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३२८/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संदीप प्र. देशपांडे (पत्रकार)<br>दै. लहूतरंग कार्यालय, दुर्गा चौक, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (गृह)<br>पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०८/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०९/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक (गृह) नागपूर जिलहा (ग्रामिण) तर्फे पोलीस उपअधिक्षक श्री व्ही. पी. शिरभाते हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, पोलीस अधिक्षक कार्यालय यांचेकडे दि. २१/१०/२०१० रोजी नागपूर जिल्हयात किती ठिकाणी लपून छपून अथवा उघडपणे अवैध धंदे सुरु आहेत तसेच नागपूर जिल्हयात किती ठाणेदारांविरुध्द अवैध धंदे सुरु असल्याबद्यल व ते धंदे बंद करण्याबद्यल

विविध संस्था संगठणांचे तक्रार पत्रे आलीत त्यांच्या झेरॉक्स देणे व पोलीस अधिक्षकांकडून ठाणेदारांवर कोणत्या स्वरुपाची कारवाई केली गेली त्याची झेरॉक्स प्रत मागितलेली आहे. परंतू अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि. २९/११/२०१० रोजी पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२२/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी, पोलीस उपअधिक्षक (गृह) पोलीस अधिक्षक कार्यालय नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांचेकडे वर नमुद केल्याप्रमाणे नागपूर जिल्हयात गुप्तपणे सुरु असणाऱ्या अवैध धंदाबाबत आणि सदर धंदे बंद करण्याबाबत विविध संघटना व संस्था यांची पत्रे येतात त्याबाबत पोलीस ठाण्याअंतर्गत कोणती कार्यवाही केली गेलेली आहे अशी माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित असलेली माहिती त्यांना मिळाली नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, पोलीस अधिक्षक कार्यालय ग्रामीण नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह) नागपूर यांचे तर्फे हजर असलेले श्री व्ही. पी. शिरभाते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २१/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयकडे दि.२६/१०/२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही संपूर्ण नागपूर जिल्ह्यासंबंधित असल्याने सदर माहिती संपूर्ण जिल्ह्यातून उपलब्ध करुन घ्यावयाची असल्यामुळे संबंधित पोलीस उपविभागीय अधिकारी तथा जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती सादर करण्यास कळविलेले आहे परंतू काही पोलीस स्टेशनकडून माहिती अप्राप्त आहे म्हणून संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त होताच माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे अपीलार्थीस दि.२९/११/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अप्पर पोलसी अधिक्षक यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.२०/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन

दिली. त्यामध्ये असे नमूद केले की, नागपूर जिल्ह्यात कोणत्याही ठिकाणी उघडपणे लपूनछपून अवैधधंदे सुरु नाहीत. काही असामाजिक तत्व पोलीसांचे त्यांचेवर लक्ष नाही असे बघून अवैधधंदे करण्याचा प्रयत्न करतात त्यावर कार्यवाही करुन अवैध धंदे नेस्तनाभूत करण्यात येतात. तसेच सन २०१० मध्ये माहे ऑक्टोबर २०१० पावेतो नागपूर जिल्ह्यांतर्गत अवैध धंदे सुरु असल्याबाबत वरिष्ठांना प्राप्त तक्रारी/गुप्त माहिती वरुन अवैध धंदाच्या ठिकाणांवर विशेष पथकांद्वारे धाडी घालून टाकण्यात आल्या. संबंधित पोलीस स्टेशनच्या एकूण १४ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना (तीन पोलीस निरिक्षक दोन सहा. पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरिक्षक, एक सहाय्यक पोलीस निरिक्षक व चार पोलीस शिपायी) यांना आर्थिक वेतनवाढ व सक्त ताकीद अशी शिक्षा देण्यात आली आणि त्याची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. सदरची माहिती प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने आयोगापुढे मान्य केले. मात्र ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवरती कार्यवाही झालेली आहे त्यांची नावे त्यांना प्राप्त झाली नाहीत तसेच अवैधधंदाबाबतच्या प्राप्त झालेल्या नागरिकांच्या आणि संघटनांच्या काही प्रती त्यांना मिळाल्या आहेत. मात्र काही प्रत त्यांना अदयापही मिळाल्या नाहीत असे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, पुन्हा अवैध धंदाबाबतच्या तक्रारींची खात्री करुन त्याच्या प्रती देण्यात येतील म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस अवैधधंदाबाबत आणखी काही तक्रारी प्राप्त असल्यास त्याची खात्री करुन अपीलार्थीस त्याच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात त्याचप्रमाणे अवैधधंदा संदर्भात १४ पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना शिक्षा देण्यात आलेल्यांच्या नावाची यादी अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

P.T.O.

२. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला नाही म्हणून याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांना सक्त ताकीद देण्यात येत असून याची पुर्नावृत्ती भविष्यात करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३३२/नाग/२०११</u>**

१. श्री पँथर यशवंत बळीराम अंबागडे - **अपीलकर्ता**
मु. पो. सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर -४४१ २१४

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी - **उत्तरवादी**
विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर

## (आदेश पारित दिनांक ०९/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय नागपूर कार्यालयीन अधिक्षक श्री अ. ए. शिरभाते हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्री सिध्दार्थ गायकवाड हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन खालील ४ मुद्यांवर माहिती मागितली होती .

१.	तहसिलदार उमेरड यांनी पाठविलेली दि.२०/०८/२०१० च्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती.

२.	मा. नामदार सामाजिक न्यायामंत्री तसेच सामाजिक न्याय व विशेष सहायक विभाग यांचेकडील दि. ३० जून २०१० रोजी पाठविलेल्या पत्रावर केलेली कार्यवाही.

३.	अनुसुचीत जाती व नवबौध्द भूमिहिनांसाठी जमीन विकत घेण्यासाठी घेण्यात आलेली जाहिर नाम्याची प्रत आणि जमीन विकत जमिन घेण्यासाठी शासकीय किमतीची माहिती.

४.	स्वाभिमान योजनेच्या परिपत्रकाची शासन निर्णयाची प्रत.

वरील माहिती ४ मुद्यांवर मागितली होती. त्यांना विहीत मुदतीत माहिती मिळाली नाही. त्यानंतर त्यांना दि.२०/१२/२०१० च्या पत्रान्वये रु ५०/- चा भरणा करण्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. त्यानुसार अपीलार्थीने  जनमाहिती अधिकारी यांचेकडे रु. ५०/- मनिऑर्डरने पाठविले. परंतू त्याची मनिऑर्डर स्विकारली नाही आणि त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. आणि त्याला अनुसरुन त्यांनी दि. २०/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस स्वाभिमान योजनेच्या परिपत्रकाच्या माहितीचे शुल्क रु. ५०/- सरकारी कोषागारात भरणेबाबत दि.२०/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविले. मात्र अपीलार्थीने मनिऑर्डर द्वारे रु.५०/- चे शुल्क पाठविले ते त्यांनी स्विकृत केले नाही. कारण अपीलार्थीस माहितीचे शुल्क  चलनाद्वारे भरणा करण्याबाबत कळविले होते असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच अपीलार्थीने प्रथम अपील विभागीय समाजकल्याण अधिकारी यांचेकडे  दाखल न करता विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचेकडे दाखल केले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने माहितीच्या अधिकाराखालील अर्जान्वये दि.०२/११/२०१० ला वर नमुद केल्याप्रमाणे एकूण ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत म्हणजेच दि. ०१/१२/२०१० पर्यन्त अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते मात्र जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०२/१२/२०१० च्या पत्रान्वये स्वाभिमान योजनेच्या परिपत्रकाची साक्षांकित प्रत मिळविण्यासाठी रु. ५०/- चे शुल्क भरणेबाबत कळविले. त्यानंतर अपीलार्थीने मनिऑर्डरद्वारे रु. ५०/- चे शुल्क पाठविले परंतू जनमाहिती अधिकारी यांनी मनिऑर्डर न स्विकारता चालानद्वारे पैसे भरण्याचे कळविलेले दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीची रु. ५०/- ची मनिऑर्डर स्विकृत केली नाही. आणि ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच रु.५०/- चे शुल्क भरण्याबाबत फक्त स्वाभिमान योजनेच्या परिपत्रकाच्या माहिती बाबतच कळविले. इतर ३ मुद्यांची माहिती अपीलार्थीस कळविलेली नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदर विलंबाद्यल जनमाहिती अधिकारी यांनी असा खुलासा केला की, कार्यालयीन कामकाजाच्या व्यस्ततेमुळे अपीलार्थीस ३० दिवसात माहिती देता आली नाही. परंतू जनमाहिती अधिकारी यांचा खुलासा हा मान्य करता येत नाही म्हणून विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या दि.०२/११/२०१० च्या अर्जातील १ ते ४ मुद्यांची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमूद केल्याप्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला दिसून येतो. त्या विलंबास जनमहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये

रु.५०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसूली त्यांचे दरमहाचे वेतनातुन कपात करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

३. सदरच्या शास्तीची वसूली विभागीय समाज कल्याण अधिकारी नागपूर यांनी करावयाची आहे.

४. सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे विभागीय समाजकल्याण अधिकारी नागपूर यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३३३/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री राजेश रामचंद्र गेडाम<br>के.के. वंजारी बिल्डींग जवळ, बारसेनगर, पाचपावली, नागपूर<br>ता. जि. नागपूर - १७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी<br>नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२<br>नागपूर गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक-२ म्हाडा नागपूर श्री राठोड हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी म्हाडा नागपूर श्री अनील अंकलगी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२८/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२ नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ नागपूर यांचेकडे म्हाडाचे अधिकृत प्लॉटवर

अनाधिकृत कब्जा केल्यास संभाव्य कार्यवाही २९ प्लॉट MIG Scheme कामठी रोड नागपूर याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदर माहिती ही बरोबर दिलेली नाही म्हणून दि. १८/०१/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.११/०२/२०११ रोजी देण्यात आला असून अपीलार्थीचे प्रथम अपील खारीज करण्यात आले म्हणून अपीलार्थीने दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी गृह निर्माण क्षेत्र व विकास मंडळ नागपूर यांचेकडे म्हाडाद्वारे एखादया व्यक्तीस प्लॉट अलोट झाल्यास सदर प्लॉटवर दुसऱ्या व्यक्तीने अनधिकृत कब्जा केल्यास त्याबाबत करावयाच्या कार्यवाही संदर्भात मार्गदर्शन/ अभिप्राय स्वरुपात माहिती मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये असंबध्द माहिती दिली आहे. सदर माहिती ही योग्य नसल्याने प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाच्या निर्णयात असे नमुद केले की, माहितीच्या अधिकारात अर्जदाराला अभिप्राय देणे किंवा प्रश्नाचे उत्तर देणे हे अभिप्रेत नाही म्हणून प्रथम अपील खारीज करण्यात आले.

४. जनमाहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक -२ श्री राठोड नागपूर गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ नागपूर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २८/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने म्हाडाद्वारे एखादया व्यक्तीस प्लॉट अलोट झाल्यास सदर प्लॉटवर दुसऱ्या व्यक्तीने अनधिकृत कब्जा केल्यास अपीलार्थीने अभिप्राय / मार्गदर्शन स्वरुपात १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्याला अनुसरुन अपीलार्थीस दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये मुद्येनिहाय माहिती देण्यात आली आणि मुद्या क्र. १,३,४,५ व ६ हे संदिग्ध प्रश्न असल्यामुळे त्याबाबत माहिती देता येत नाही परंतू मुद्या क्र. २ बाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर माहिती प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने मान्य केले परंतू माहितीच्या संदर्भात अभिप्राय व मार्गदर्शन दिलेले नाही असे अपीलार्थीने सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीने जनमाहिती अधिकारी यांचेकडे १ ते ६ मुद्यांवर अभिप्रायात्मक व मार्गदर्शपर माहिती मागितलेली आहे माहितीच्या अधिकारात अभिप्रायात्मक किंवा मार्गदर्शन किंवा मत याबाबत माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. फक्त कलम २ मध्ये माहितीच्या व्याख्येत येणाऱ्या बाबीचींच माहिती उपलब्ध करुन देण्यात येते. म्हणून अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. १ आणि ५ याबाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. १ व ५ बाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३३१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>प्लॉट नं. २७०, चंदन नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर- ४४० ००९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक<br>नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह)<br>नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ०९/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ०९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक (गृह) नागपूर जिल्हा (ग्रामिण) श्री डी. डी. तिडके हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक, नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांचे तर्फे श्री डी. डी. तिडके यानांच प्राधिकृत केले आहे.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.१४/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक नागपूर जिल्हा (ग्रामिण) नागपूर यांचेकडे  पोलीस उपअधिक्षक मुख्यालय श्री डी. डी. तिडके यांच्या दि.१०/११/२०१० च्या चौकशी अहवालाचा खुलासा, तसेच दि.०४/१२/२०१० च्या अर्जावर फेरचौकशीच्या कारवाई संदर्भात माहिती मिळाली तसेच विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालयाकडून त्यांच्या अर्जावर आपले कार्यालयाकडून चौकशी मागितली काय अशी माहिती मागितलेली आहे. परंतू अपीलार्थीस अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. ०४/०२/२०११ रोजी अपर पोलीस अधिक्षक, (गृह) नागपूर जिल्हा (ग्रामिण) यांचेकडे  प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १४/१२/२०१० च्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी अपेक्षेप्रमाणे माहिती पुरविलेली नाही. मात्र दि.०५/०१/२०११ च्या पत्रान्वये जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना असे कळविले की, आपण सादर केलेल्या तक्रार अर्जाची फेरचौकशी पूर्ण होणे बाकी आहे करीता संबंधीत अधिकाऱ्याकडून चौकशी पूर्ण होताच त्या संबंधीची माहिती पुरविण्यात येईल असे फक्त कळविले. म्हणून दि.०४/०२/२०११ रोजी प्रथम अपील अपर पोलीस अधिक्षक यांचेकडे दाखल केले मात्र प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली व निर्णयही दिला नाही म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

४.	आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक श्री तिडके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १४/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्यामध्ये अपीलार्थीने दि. ०४/१२/२०१० च्या अर्जावर फेरचौकशीच्या संदर्भात माहिती मागितली होती. आणि विशेष पोलीस महानिरिक्षक कार्यालयाकडून अर्जदाराच्या अर्जावर काय कार्यवाही केली याची माहिती मागितली होती. या अर्जाच्या माहितीला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक यांनी दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस आपण सादर केलेल्या नमुद दिनांकाच्या तक्रार अर्जाची फेरचौकशी पूर्ण होणे बाकी आहे. करीता संबंधित अधिकाऱ्यांकडून चौकशी पूर्ण होताच त्या संबंधिची माहिती आपणास तात्काळ पुरविण्यात येईल असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले.

५. अप्पर पोलीस अधिक्षक नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर श्री व्ही. डी. रुडे यांनी अपीलार्थीस दि. २६/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, आपण दि.०४/१२/२०१० रोजी दिलेल्या अर्जावर दुसऱ्या अधिकाऱ्यामार्फत फेरचौकशी करण्याची विनंती केली होती. आपल्या विनंती वरुन फेरचौकशीसाठी उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांना कळविण्यात आले होते. सदर चौकशीसाठी आपणास बोलविले असता आपण रामटेक येथे गेले नाही त्यामुळे आपण यात सहकार्य केले नाही म्हणून चौकशी करता आली नाही असे उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांनी अहवालात नमूद केले आहे. तसेच विशेष पोलीस महानिरिक्षक नागपूर परिक्षेत्र नागपूर यांचे कार्यालयात दि.०४/१२/२०१० रोजी आपण दिलेल्या अर्जाची चौकशी करण्याचे आदेश दिले आहे असे प्रथम अपीलीय अधिकारी श्री व्ही. डी. रुडे यांनी अपीलार्थीस दि. २६/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले की, उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांनी दि. ०२/०२/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, अपीलकर्ता यांनी तक्रार अर्जावर दिलेल्या चौकशी संदर्भात ते कोणतेही सहकार्य करीत नाही त्यामुळे त्यांच्या तक्रारीवर चौकशी होवू शकली नाही.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. ०४/१२/२०१० च्या तक्रारीवर फेरचौकशीचे काम उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग रामटेक यांचेकडे दिलेले आहे मात्र उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक यांनी दि. ०२/११/२०११ च्या पत्रान्वये कळविले की, अपीलकर्ता यांनी चौकशी अधिकारी यांना सहकार्य न दिल्यामुळे त्यांच्या तक्रारीवर चौकशी होवू शकली नाही असा त्यांनी अहवाल दिलेला आहे. म्हणून प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस ही बाब कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस चौकशी संदर्भातील वर नमुद केलेली बाब त्यांना रजिस्टर पोस्टाने कळविण्यात यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३४०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भाऊ सचिदानंद नथ्थुजी लोखंडे<br>संघर्ष-५८, मोहगाव (झिलपी) पो. मोहगाव<br>ता. हिंगणा जि. नागपूर - ४४१ ११० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता<br>सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.३, नागपूर<br>ग्रामिण पोलीस अधिक्षक कार्यालयासमोर, सिव्हील लाईन, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय कार्यकारी अधिकारी<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग-हिंगणा<br>बंग-ईस्टेट, पहिला माळा रायपूर-हिंगणा पो. ता. हिंगणा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगणा श्री कुंभलकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम क्र.३ नागपूर यांचे वतीने उपकार्यकारी अभियंता श्री एस. एस. मुजुमदार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम उपविभाग हिंगणा यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन सन २००८-०९ मधील अर्थसंकल्पीय बाबी संदर्भात झालेल्या रस्त्यांचे मजबुतीकरण, डांबरीकरण इ. बाबत विविध मुद्यांवर १ ते ४४ रस्त्यांच्या संदर्भात माहिती मागितली होती. त्यामध्ये प्रामुख्याने (क) क्रस्ट रजिस्टर नोंदणीत काम करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्याची प्राकलन प्रत, (ख) करारनामा शेडयुल व मोजमाप पुस्तीकेच्या झेरॉक्स प्रती, (ग) कामावर देखरेख ठेवणाऱ्या शाखा अभियंता यांचे पूर्ण नाव व निवासी पत्ता, (घ) कामांची प्रगती (ड) झालेला खर्च, (च) इतर माहिती न्यायालयीन प्रक्रियेकरिता लागणारी इ. माहिती अपीलार्थीने मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी पाहिजे असलेली माहिती न देता पत्रव्यवहार करुन माहिती देण्यात टाळले. तसेच ५९ दिवस पुर्ण होऊनही माहिती मिळाली नाही म्हणून सार्वजनिक बांधकाम विभाग नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात दि.१५/०२/२०११ पर्यंत विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश असतांनाही माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी श्री कुंभलकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला त्यावेळेला तात्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणून श्री प्रभाकर पाटील हे कार्यरत होते. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि. २२/१२/२०१० च्या पत्रान्वये १ ते ६ मुद्यांवर काही माहिती अपीलार्थीस पाठविलेली होती. परंतू ती अपूर्ण असल्याचे सांगून अपीलार्थीने ती स्विकारली नाही. त्यानंतर दि.०९/०२/२०११ च्या पत्रान्वये १ ते १५ मुद्यांची माहिती पाठविली मात्र ती देखील माहिती अपूर्ण आहे म्हणून अपीलकर्त्याने घेतली नाही. त्यानंतर अपीलकर्ता यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले प्रथम अपीलाची सुनावणी झाली आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलार्थीस दि. १५/०२/२०११ पर्यन्त संपूर्ण माहिती विनमुल्य पुरविण्याचे आदेश देण्यात आले परंतू दि. १५/०२/२०११ पर्यन्त अपीलार्थीस माहिती उपलब्ध झाल्याचे दिसत नाही असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री मुजुमदार यांनी आयोगापुढे सांगितले की, प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०८/०२/२०११ रेजी देण्यात आला असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १५/०२/२०११ पर्यन्त संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी असे आदेश दिले

होते. मात्र दि. १५/०२/२०११ पर्यंत अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही असे श्री मुजुमदार यांनी सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.१२/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे आत अपीलार्थीस कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/१२/२०१० च्या पत्रान्वये व दि. ०९/०२/२०११ च्या पत्रान्वये अपूर्ण माहिती अपीलार्थीस पाठविल्याचे दिसून येते. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानुसर दि. १५/०२/२०११ पर्यन्त जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिलेली दिसत नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती पुरविण्यास विलंब झालेला दिसून येतो. सदरच्या विलंबास तात्कालीन जनमाहिती अधिकारी श्री प्रभाकर पाटील हे जबाबदार दिसून येतात. म्हणून विलंबाबद्यल तात्कालीन जनमाहिती अधिकारी यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) प्रमाणे रु. २०,०००/- शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर करणे आवश्यक आहे. तसेच विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या दि. १२/११/२०१० च्या माहिती अर्जातील १ ते ४४ मुद्यांची माहिती वर नमुद केल्याप्रमाणे दि.१०/०७/२०११ पर्यन्त विनामुल्य अपीलार्थीस व्यक्तीशः उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आदेश</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांचे दि. १२/११/२०१० च्या माहिती अर्जातील संपूर्ण माहिती वर नमुद केल्याप्रमाणे दि.१०/०७/२०११ पर्यंत विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२. तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी श्री प्रभाकर पाटील यांनी अपीलार्थीच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही दि.१५/०२/२०११ पर्यन्त अपीलार्थीस संपूर्ण विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसतो. सदर विलंबाबद्यल ते दोषी आढळून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. २०,०००/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा लेखी खुलासा त्यांनी १५ दिवसांचे आत आयोगापुढे सादर करावा. अन्यथा त्यांचेवर शास्ती कायम करण्यात येईल.

३. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी या निर्णयाची एक प्रत तात्कालीन जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेकडे खुलासा सादर करण्यासाठी पाठवावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३३९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री भाऊ सचिदानंद नथ्थुजी लोखंडे<br>संघर्ष-५८, मोहगाव (झिलपी) पो. मोहगाव<br>ता. हिंगणा जि. नागपूर - ४४१ ११० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत विभाग)<br>पंचायत समिती हिंगणा<br>ता. हिंगणा जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत मोहगाव (झिलपी) पो. मोहगाव<br>ता. हिंगणा जि. नागपूर - ४४१ ११० | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत मोहगाव (झिल्पी) ता. हिंगणा श्री प्रकाश ढाले हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत) श्री प्रविण देशमुख हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.२६/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत मोहगाव (झिल्पी) हिंगणा यांचेकडे सन २००५ ते २०१० मध्ये सर्व प्रकारच्या निधीतून मोहगाव

(झिल्पी) ता. हिंगणा येथे केलेल्या विकास कामाची खालीलप्रमाणे ४ मुद्यांवर  मुद्येनिहाय माहिती मागितलेली आहे.

क) क्रष्ट रजिस्टरमध्ये नोंदी केलेल्या रस्त्याचे काम करण्यापूर्वी व काम पूर्ण झाल्यावरची नोंद,

ख) प्राकलन प्रत.

ग) निविदासुचना प्रत.

घ) काम चालू करण्याच्या आदेशाची प्रत.

ड) मोजमाप पुस्तकातील कामाच्या घेतलेल्या नोंदीच्या झेरॉक्स प्रती.

च) कामाला मंजुरीकरिता ग्रामपंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रत.

छ) काम करणारी यंत्रणा ग्रामपंचायतीतील कंत्राटदार मजुरांच्या मंजुरीची वेतनपत्रकाची झेरॉक्स प्रत.

ज) कामासाठी  लागणाऱ्या सर्व प्रकारच्या साहित्याची खरेदी केली त्या बिलांच्या झेरॉक्स प्रती.

इ. माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.०३/०१/२०११ रोजी विस्तार अधिकारी (पंचायत) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०८/०२/२०११ रोजी देण्यात आला असून त्यामध्ये जनमाहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्याचे आदेश देण्यात आले आहे. तरीदेखील माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांच्या माहिती अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसात माहिती दिली नाही. तसेच त्यांच्या कार्यालयाकडे माहिती मागण्यास गेलो असता ते माहिती देत नाही आणि माहिती देण्यास टाळाटाळ करुन माहिती देण्यास त्रास देतात म्हणून प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे ७ दिवसात माहिती देण्याचे आदेश असतांनाही जनमाहिती अधिकारी यांनी माहिती पुरविलेली नाही म्हणून आयोगाकडे अपील दाखल करावे लागले. त्यामुळे संबंधित अधिकाऱ्यावर माहिती अधिकार कायद्याप्रमाणे शास्तीची कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी अपीलार्थीने आयोगापुढे केली.

४.	जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत मोहगाव झिल्पी श्री प्रकाश ढाले यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२६/११/२०१० रोजी प्राप्त झाले होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती दि.१७/०२/२०११ ला यूपीसीने पाठविण्यात आली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. परंतू सदर माहिती अपूर्ण असून माहिती अर्जातील मुद्या क्र.२ व ३ ची कोणतीही माहिती त्यांना मिळालेली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/११/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन ३० दिवसात कोणतीही माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली नाही. मात्र दि.१७/०२/२०११ च्या पत्रान्वये काही अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामध्ये मुद्या क्र.२ व ३ ची माहिती उपलब्ध करुन दिली नाही. या विलंबाबद्यल जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, कामाच्या व्यापामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस माहिती देता आली नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील विस्तार अधिकारी पंचायत यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०८/०२/२०११ रोजी देण्यात येवून ७ दिवसांत विनामुल्य माहिती पुरविण्याचे आदेश दिले होते असे प्रथम अपीलीय अधिकारी श्री देशकर यांनी आयोगापुढे सांगितले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.२६/११/२०१० च्या माहिती अर्जास अनुसरुन ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. ३० दिवसानंतर दि.१७/०२/२०११ च्या पत्रान्वये अपूर्ण माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. त्यामुळे माहिती उपलब्ध होण्याच्या विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. विलंबाबद्यल त्यांनी केलेला खुलासा मान्य करण्यासारखा नाही. तसेच अपीलार्थीस माहिती अर्जातील मुद्या क्र.२ व ३ ची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री प्रकाश ढाले यांनी अपीलार्थीस माहिती अर्जातील मुद्या क्र.२ व ३ ची माहिती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन द्यावी.

२. जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री प्रकाश ढाले यांनी अपीलार्थीस ३० दिवसांचे मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहिती उपलब्ध होण्यास विलंब झालेला दिसतो. सदर विलंबाबद्यल ते दोषी आढळून येतात म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. १०,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसूलीची रक्कम त्यांचे दरमहाचे वेतूनातून करण्यात येवून ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करण्यात यावी.

३. सदर शास्तीच्या वसूली संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती हिंगणा यांनी करावी. त्याकरिता त्यांना सदर निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे पाठविण्यात यावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३३८/नाग/२०११</u>**

१. श्री देवराव नत्थुजी चटप - **अपीलकर्ता**
२०, ओंकार नगर, पोस्ट-पार्वतीनगर रिंग रोड, नागपूर
ता. जि - ४४००२७

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी - **उत्तरवादी**
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा - **उत्तरवादी**
प्राथमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर
ता. जि. नागपूर

**(आदेश पारित दिनांक १०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी, श्री बाराहाते हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद नागपूर श्री नैताम हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०९/१२/२०१० रोजी मॅट्रीक एस.टी.सी. च्या १२०-२२० या वेतनश्रेणीनुसार थकबाकी मिळाल्याबाबत दि. ०१/०१/१९८१ ते दि.३१/१२/१९९५ पर्यंतची माहिती मागितलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२८/१२/२०१० ला माहिती

प्राप्त करुन देण्यात आली परंतू सदर माहिती ही दिशाभूल करणारी व बरोबर नसल्यामुळे अपीलार्थीने दि.०६/०१/२०११ रोजी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.०८/०३/२०११ रोजी देण्यात आला असून सदरचे प्रथम अपील नस्तीबध्द करण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दि.२१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०९/१२/२०१० च्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ) यांचेकडे मॅट्रीक एस.टी.सी. ट्रेन्ड शिक्षकांना १२०-२२० या वेतनश्रेणीनुसार थकबाकी मिळाल्याची माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी माहिती दिलेली आहे. त्यामुळे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपील नस्तीबध्द करुन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही अद्यापावेतो केलेली नसल्यामुळे आयोगाकडे दुसरे अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी श्री बाराहाते यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२७/१२/२०१० ला प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात त्यांना दि.२८/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविण्यात आले की, अपीलार्थीने मागितलेल्या मॅट्रीक एस.टी.सी. ट्रेन्ड शिक्षकांना १२०-२२० या वेतनश्रेणीनुसार संपूर्ण कार्यवाही पूर्ण झालेली आहे. अपीलार्थीस थकबाकी सुध्दा पंचायत समिती खंडविकास अधिकारी यांचेकडून अदा झालेली आहे. तसेच या विषया संदर्भात माहितीच्या अधिकारात यापूर्वीच मुळ अभिलेख सेवापुस्तकाच्या प्रती एकूण ५७ पाने प्रमाणित करुन पुरविलेली आहेत. आणि मुळ सेवा पुस्तकांचे निरिक्षण सुध्दा अपीलार्थीने या कार्यालयात केलेले आहे अशी माहिती अपीलार्थीस दि.२८/१२/२०१० च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिलेली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी श्री नैताम यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे मुळ सेवापुस्तक व वेतन निश्चितीची आणि नस्तीची संपूर्ण तपासणी अपीलार्थीने करुन अपीलार्थीस एस.टी.सी. वेतनश्रेणी रु. १२०-२२० प्रमाणे वेतन निश्चिती करुन त्याबाबतची थकबाकी रु. ९९००/- देखील अदा करण्यात आले आहेत. त्यामध्ये प्रस्तुत प्रकरणी आता कोणतीही थकबाकी देणे बाकी नाही

असे प्रथम अपीलाच्या निर्णयात नमुद करुन अपीलार्थीस कळविण्यात आल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमहिती अधिकारी यांनी दि.२८/१२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३६१/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मोहम्मद अकरम इमदाद अली<br>मेन. रोड. सरस्वती शाळेजवळ, हुसैनाबाद, कामठी<br>ता. कामठी जि. नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी<br>नागरी जमीन कमाल धारणा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>नागरी जमीन कमाल धारणा, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ लिपीक, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर श्री हेडाऊ हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर तर्फे श्री देशमुख सहायक नगर रचनाकार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.१६/०७/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा नागपूर यांचेकडे माहिती अधिकाराखालील अर्जान्वये नागरी जमीन कमाल धारणा

अधिनियम १९७६ चे कलम २३ खाली  निवासी  वापरा करिता दि.१३/०७/२००९ रोजी सादर केलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि.१०/०८/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यामध्ये नमुद केले की, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ अंतर्गत शासनास उपलब्ध झालेल्या जमिनी कलम २३ खाली विविध विश्वस्त संस्था, गृह निर्माण संस्था यांना वाटप करण्याची तरतुद आहे या जमिनी व्यक्तीगत स्वरुपात वाटप करण्यात येत नाही त्यामुळे त्यांनी प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी यांचेकडे दि.१३/१०/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.०३/११/२०१० रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि.२५/११/२०१० रोजी देण्यात येवून त्यांचे प्रथम अपील फेटाळण्यात आले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.१०/०८/२०१० च्या पत्रान्वये प्राप्त झालेली माहिती ही दिशाभूल करणारी आणि चूकीची आहे.

३.	जनमाहिती अधिकारी, नागरी जमीन कमाल धारणा कार्यालय नागपूर श्री हेडाऊ  हे हजर असून त्यांनी आयेगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १६/०७/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जातील माहितीला अनुसरुन त्यांनी अपीलार्थीस दि. १०/०८/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, दि. १३/०७/२००९ ला या कार्यालयास सादर केलेल्या अर्जान्व्ये मौजा इसासनी खसरा क्र. ११० मधील मंजुर भुखंड विकास योजनेतून शासनास विनामुल्य प्राप्त झालेल्या ५७८७.५० चौ. मी. जमीनी पैकी ३००० चौ. फुट जमीन नागरी जमीन कमला धारणा अधिनियम ७६ चे कलम २३ खाली रहिवासी वापरा करिता मिळण्यासाठी विनंती केली आहे. तथापी नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ अंतर्गत शासनास उपलब्ध झालेल्या जमिनी कलम २३ खाली विविध विश्वस्त संस्था, गृह निर्माण संस्था यांना वाटप करण्याची तरतुद आहे या जमिनी व्यक्तीगत स्वरुपात वाटप करता येत नाही असे अपीलार्थीस कळविले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४.	त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील अपर जिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी नागरी जमीन कमाल धारणा नागपूर यांचेकडे दाखल केले. त्याचा निर्णय दि. २५/११/२०१० रोजी देण्यात येवून त्यामध्ये असे नमुद केले की,

जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १०/०८/२०१० ला दिलेली माहिती बरोबर व योग्य आहे म्हणून अपीलार्थीचे प्रथम अपील फेटाळण्यात आले आहे असे श्री देशमुख यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. १६/०७/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. १०/०८/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. आणि सदरच्या माहितीमध्ये अपीलार्थीस असे कळविले आहे की, नागरी जमीन कमाल धारणा अधिनियम १९७६ अंतर्गत शासनास उपलब्ध झालेल्या जमिनी कलम २३ खाली विविध विश्वस्त संस्था, गृह निर्माण संस्था यांना वाटप करण्याची तरतुद आहे. या जमिनी व्यक्तीगत स्वरुपात वाटप करण्यात येत नाही. तथापी यावर अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, व्यक्तीगत स्वरुपात देखील सदरच्या जमीनी वाटप करण्याची तरतुद नागरी जमिन कमाल धारणा अधिनियम १९७६ अंतर्गत आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांचे आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे आहे की, या कायदयात व्यक्तीगत स्वरुपात जमीन वाटप करण्याची तरतुद नाही. म्हणून याबाबत अपीलकर्त्याने योग्य त्या प्राधिकरणाकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलार्थीस त्यांनी आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३६७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री टी. श्रीनिवासु<br>७, हिमालय अपार्टमेंट, १९ एन आय टी ले आऊट, रविनगर, नागपूर<br>ता. जि नागपूर-१० | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य<br>जे. एल. चतुर्वेदी कॉलेज ऑफ फार्मसी<br>इलेक्ट्रानिक झोन बिल्डींग, एम. आय. डी. सी. हिंगणा रोड, नागपूर-१६ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>जे. एल. चतुर्वेदी कॉलेज ऑफ फार्मसी<br>इलेक्ट्रानिक झोन बिल्डींग, एम. आय. डी. सी. हिंगणा रोड, नागपूर-१६ | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १६/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी यांचे तर्फे ॲड. रोहीत जोशी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, जे. एल. चतुर्वेदी कॉलेज ऑफ फार्मसी हिंगणा नागपूर यांचेकडे दि.२२/११/२०१० ला कु. लक्ष्मी श्रीकरी

तडिकमल्ला यांच्या बी फॉर्मसी भाग-१ ला प्रवेश होवून त्यांच्या पूर्वपरवानगीने प्रवेश रद्य केल्यानंतर वार्षिक शुल्क परत केले नाही. तसेच सदर कोर्सच्या उपलब्ध असलेल्या जागांबाबत १ ते ६ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना प्राचार्य जे. एम. चतुर्वेदी कॉलेज ऑफ फॉर्मसी यांचेकडून दि.१२/०१/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले. जे. एल. चतुर्वेदी कॉलेज ऑफ फार्मसी हे कॉलेज लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्था स्वतःच्या निधीतून हे कॉलेज चालवित आहे म्हणून सदरच्या संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही तसेच या बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्र.५१३२/२००८ मधील निर्णयानुसार माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी शासनाकडून अनुदान मिळत नसलेल्या संस्थेला लागू होत नाही असे प्राचार्य यांनी त्यांना दि. १२/०१/२०११ च्या पत्रान्वये कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय त्यांना देण्यात आलेला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्राचार्य यांचे वतीने ॲड. अमीत कुकडे हे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की, लोकमान्य टिळक जनकल्याण शिक्षण संस्थेचे सदरचे फार्मसी कॉलेज विना अनुदान तत्वावर कार्यरत आहे. सदरचे कॉलेज विनाअनुदान तत्वावर असल्यामुळे सदरच्या कॉलेजला कोणत्याही प्रकारचे शासनाचे अनुदान प्राप्त होत नाही. तसेच सदरच्या कॉलेजला विनाअनुदान तत्वावर सुरु करण्यास तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुबंई यांचेकडून दि. ०८/१०/१९९७ रोजी परवानगी मिळालेली आहे. सदरच्या परवानगी पत्रात देखील विनाअनुदान तत्वावर औषध निर्माण शास्त्र महाविद्यालय सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे असे नमुद केले आहे. ज्या संस्थांना शासनाकडून कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही अशा संस्था माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीनुसार सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी याचिका क्र. ५१३२/२००८ मध्ये दि.२०/०८/२००९ रोजी दिला असल्याचे ॲड. कुकडे यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच प्राचार्य यांचे वतीने उपस्थित असलेले श्री कुकडे यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, सदरच्या फार्मसी कॉलेजला तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई यांचेकडील

दि.०८/१०/१९९७ च्या पत्रान्वये विनाअनुदान तत्वावर महाविद्यालय सुरु करण्याची परवानगी दिली आहे. तसेच सदरच्या महाविद्यालयास शासनाचे कोणतेही अनुदान प्राप्त होत नसल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे मा. उच्च न्यायालय यांचेकडील याचिका क्र. ५१३२/२००८ मधील निर्णयानुसार सदरच्या फार्मसी कॉलेजला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदी लागू होत नाही. म्हणून अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३६०/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेन्द्र पुंडलिकराव रेवतकर<br>हनुमान मंदिर जवळ, आय. यु.डी.पी. काटोल<br>ता. काटोल जि नागपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त (मुख्यालय)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहायक पोलीस आयुक्त (प्रशासन)<br>पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक १६/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २८/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.१६/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १६/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर श्री एस. एस. कुदरे हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर श्री एम. एल गुर्जर हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १५/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त (प्रशासन) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दि. ०७/०९/२०१० रोजी पोलीस आयुक्त यांचेकडे शासनाची फसवणूक करुन प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केल्याबाबत तक्रार केली होती. त्या तक्रारीची चौकशी करण्यासाठी DCP परिमंडळ-१ यांना तक्रार पाठविली होती. त्या तक्रारीमध्ये झालेले बयान व केलेली कार्यवाही या बाबतची माहिती त्यांनी मागितली होती. त्याबाबत त्यांना बयानाच्या प्रती मिळालेल्या आहेत. परंतू प्रवीण राऊत ब. न. ६४८६ यांचेवर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपेक्षेप्रमाणे मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील पोलीस उपायुक्त (मुख्यालय) पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर यांचेकडे दाखल केले होते. परंतू त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही असे अपीलार्थीचे म्हणणे आहे.

३.	जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुकत श्री कुदरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १५/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी आस्थापना शाखेला दि. १५/११/२०१० रोजी पत्र लिहून माहिती मागितली. त्यांच्याकडे माहिती प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस दि.०६/१२/२०१० रोजी माहितीचे शुल्क रु. ४४/- चा भरणा करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलार्थीने माहितीचे शुल्क रु.४४/- चा भरणा केला आणि अपीलार्थीस दि.०७/१२/२०१० च्या पत्रान्वये तयार केलेल्या २२ पेजेसची माहिती दि. १३/१२/२०१० रोजी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र त्यांच्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना मिळालेली नाही असे त्यांनी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेल्या माहितीमध्ये दि.३१/०५/२०११ च्या आस्थापना शाखेचे माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. तक्रारकर्ता यांनी या कार्यालयास सादर केलेल्या दि. ०७/९/२०१० च्या विनंती अर्जाला अनुसरुन या कार्यालच्या आस्थापनेवरील पोलीस शिपायी /६४८६ प्रविण पुरुषोत्तम राऊत यांनी त्यांचे साक्षांकन नमुन्यात खोटी माहिती सादर केल्याचे स्पष्ट होत नाही. त्यामुळे त्यांची नियुक्ती रद्य करण्याबाबत कार्यवाही करणे योग्य होणार नाही असे अपीलार्थीस

कळविलेले आहे. मात्र याबाबत अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, पोलीस शिपायी प्रवीण पुरुषोत्तम राऊत यांचेवर याबाबत कार्यवाही होणे जरुरीचे आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०७/१२/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे आणि त्यामध्ये तक्रारकर्ता यांचे दि. ०७/०९/२०१० च्या अर्जाला अनुसरुन पोलीस शिपायी श्री प्रविण पुरुषोत्तम राऊत यांनी त्यांच्या साक्षांकन नमुन्यात खोटी माहिती दिल्याचे स्पष्ट होत नाही त्यामुळे त्यांची नियुक्ती रद्द करण्याबाबत कार्यवाही करणे योग्य होणार नाही असे नमुद करुन अपीलार्थीस कळविलेले आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याचे दिसून येते त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३८२/नाग/२०११**

१. श्री परमेश्वर किसनजी बुटले - **अपीलकर्ता**
मु. पिंपळगाव (माथनकर)
पो. ता. हिंगणघाट जि. वर्धा-४४२३०१

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी - **उत्तरवादी**
सावळी (वाघ) पोस्ट - सावळी (वाघ)
ता. हिंगणघाट जि. वर्धा

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र. ३४ - **उत्तरवादी**
पिंपळगाव (माथनकर)
पो. ता. हिंगणघाट जि. वर्धा

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०४/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र. ३४ पिंपळगाव (मथनकर) ता. हिंगणघाट जि. वर्धा श्री एन. एन. महल्ले हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मंडळ अधिकारी सावळी (वाघ) ता. हिंगणघाट श्री आर. टी. उके हजर आहेत.

२.        अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी  दि. ०७/१२/२०१० ला माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा तलाठी पिंपळगाव यांचे वडीलांचे नावे (कै.किसनजी बुटले) हिंगणघाट हे जिवंत असतांना त्यांनी दि.१७/०६/१९८९ रोजी मृत्यूपत्र तयार केले होते त्या मृत्युपत्राच्या आधारे शेत सर्वे नं. २९८/०२ मध्ये फेरफाराच्या नोंदी झालेल्या आहेत. त्या मृत्यूपत्राची प्रत त्यांनी मागितली होती. त्याचप्रमाणे शेत सर्व्हे नं. २९८/०२ पी१, पी२, नवीन ७/१२ व जुने ७/१२, जुने व नवीन नकाशे आणि तहसिलदार यांच्या फेरफार नोंदीच्या आदेशाची प्रत मिळण्याबाबतची माहिती मागितली होती. त्यानुसार अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून सर्वे नं. २९८/२ चे फेरफार ची नोंदी तसेच पी१, पी२, ७/१२ च्या उताऱ्याच्या प्रती आणि जुने नकाशे व नवीन नकाशाच्या प्रती उपलब्ध झाल्या मात्र त्यांचे वडीलांच्या दि. १७/०६/१९८९ च्या मृत्युपत्राच्या प्रती व तहसिलदार यांच्या आदेशाची प्रत त्यांना प्राप्त  झाली नाही म्हणून त्यांनी दि. २४/१२/२०१० ला प्रथम अपील मंडळ अधिकारी सावळीवार यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि.१७/०१/२०११ ला देण्यात आला असून सदराचे  प्रथम अपील फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे त्यांनी दि. ०४/०२/२०११ रोजी  राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.        जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री महल्ले हे हजर असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीने मागितलेली माहिती त्यांच्या रेकॉर्डमधून काढण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.२२/१२/२०१० च्या पत्रान्वये सन १९८९-९० ची फेरफार नक्ल पी१, पी२ ची नक्कल तसेच नवीन व जुने ७/१२ ची नक्कल संबंधित  माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या दस्तऐवजांचा शोध घेतला असता त्यामध्ये मृत्यूपत्राची प्रत व तहसिलदार यांच्या आदेशाची प्रत त्यांना उपलब्ध झाली नाही म्हणून सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन देता येत नाही असे दि. २२/१२/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आल्याचे तलाठी यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर अपीलार्थीने आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, त्यांना वर नमुद केलेली कागदपत्रे तलाठयाकडून प्राप्त झाली मात्र त्यांच्या वडीलांचे मृत्युपत्राची प्रत आणि तहसिलदार यांच्या आदेशाची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून या दोनही दस्तऐवजांची त्यांना न्यायालयीन कामासाठी आवश्यकता आहे. म्हणून सदर दस्तऐवज त्यांना उपलब्ध होणे जरुरीचे आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि. २२/१२/२०१० रोजी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती दिली असल्याचे दिसून येते. परंतू अपीलार्थीस त्यांच्या वडीलांचे मृत्यूपत्राची प्रत त्यांना न्यायालयीन कामासाठी आवश्यक असल्यामुळे त्यांना ती पुरविणे आवश्यक आहे ही बाब लक्षात घेऊन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी आणि मंडळ अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेल्या रेकॉर्डचा पुन्हा कसून शोध घेऊन अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत तलाठी आणि मंडळ अधिकारी या दोघांनी त्यांच्या कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या रेकॉर्डचा कसून शोध घ्यावा आणि त्याच्या प्रती उपलब्ध झाल्यास अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी. मात्र कसून शोध घेतल्यानंतरही त्याच्या प्रती उपलब्ध न झाल्यास तसे स्पष्टपणे अपीलार्थीस कळवावे.

२. सदरच्या दस्तऐवजांचा कसून शोध घेण्यासाठी अपीलकर्ता यांनी तलाठी व मंडळ अधिकारी यांना सहकार्य करावे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३८३/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री मारोती बाबाराव येते<br>टिळक नगर, पुलगांव<br>ता. देवळी जि. वर्धा-४४२ ३०२ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक<br>सहकारी संस्था, वर्धा<br>ता. हिंगणघाट जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा विशेष वसूली अधिकारी<br>वर्धा जिल्हा नागरी व ग्रामीण तथा कर्मचारी सहकारी पत संस्थांचा संघ मर्या. वर्धा<br>रामनगर, भगतसिंग चौक ता. जि. वर्धा | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १८/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा विशेष वसूली अधिकारी, वर्धा जिल्हा नागरी व ग्रामिण तथा कर्मचारी सहकारी पत संस्थांचा संघ मर्या. वर्धा श्री रुपेश पाटोळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा तर्फे व्ही. ई. मुन, सहायक निबंधक समुद्रपूर हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा विशेष वसूली अधिकारी, वर्धा जिल्हा नागरी व ग्रामिण तथा कर्मचारी सहकारी पत संस्थांचा संघ मर्या. यांचेकडे माहिती अधिकाराखालील दि.२८/१०/२०१० च्या अर्जान्वये श्रीमती वेणुताई पांडुरंग नोडवीकर रा. पुलगांव हिने लिलावानंतर किती रक्कम भरणा केली व कसे याची लेखी स्वरुपात माहिती मागितलेली आहे. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडू विहीत मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २८/१०/२०१० च्या अर्जात नमुद माहिती जनमाहिती अधिकारी तथा विशेष वसूली अधिकारी वर्धा जिल्हा नागरी व ग्रामिण तथा कर्मचारी सहकारी पत संस्थांचा संघ मर्या. यांचेकडे मागितली होती आणि त्या मध्ये श्रीमती वेणुताई पांडुरंग नोडवीकर रा. पुलगांव हिने लिलावानंतर किती रक्कम भरणा केली त्याबाबत माहिती मागितली होती. तसेच दि.२८/१०/२०१० च्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी निश्चित वेळेत माहिती दिली नाही. परंतू प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक यांनी जनमाहिती अधिकाऱ्यास माहिती पुरविण्याचे आदेश दिले परंतू माहिती उपलब्ध न करुन दिल्याबद्यल त्यांच्यावर कोणतीही दंडात्मक कार्यवाही केली नाही. त्यामुळे त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा विशेष वसूली अधिकारी श्री रुपेश पाटोळे हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२८/१०/२०१० च्या माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला. मात्र वर्धा जिल्हा नागरी व ग्रामिण तथा कर्मचारी सहकारी पतसंस्थांचा हा संघ आहे आणि या संघाने स्वतंत्रपणे विशेष वसुली अधिकारी नेमले आहेत. या संस्थेला शासनाकडून कोणत्याही प्रकारचे वित्तीय सहाय्य किंवा अनुदान मिळत नाही. म्हणून सदर संस्थेस माहिती अधिकाराच्या तरतुदी लागू होत नाही. त्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतू त्यानंतर अपीलार्थीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी दि.०६/०१/२०१० रोजी घेण्यात आली. आणि त्यामध्ये

जिल्हा उपनिबंधकांनी अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०७/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलार्थीने मान्य केले. मात्र अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की, ते थकबाकी ची रक्कम संस्थेकडे भरण्यास तयार आहेत. म्हणून त्यांच्या मालमत्तेचा लिलाव करण्यात येवू नये. याबाबत अपीलार्थीने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था वर्धा यांचेकडे दाद मागणे योग्य राहील. कारण सदरची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०७/०१/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज करण्चास प्राप्त आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३८१/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री शामदेव काशिरामजी तितरमारे<br>प्लॉट नं. २७०, चंदननगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त/पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | (i) जनमाहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर<br>(ii) जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उप अधिक्षक<br>ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर<br>ता. जि. नागपूर | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक १८/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०७/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. १) जनमाहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, नागपूर श्री टि. के. रॉय हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपायुक्त, पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर तर्फे जनमाहिती अधिकारी श्री रॉय यानांच प्राधिकृत केले आहे.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२२/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो यांचेकडे दि. ०८/११/२०१० च्या तक्रार अर्जाने शेषराव शामराव कळसकर, जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय अमरावती यांचे विरुध्द ज्ञातस्त्रोपेक्षा जास्त उत्पन्नाबाबत तक्रार केली होती त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू सदर माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा अप्पर पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो श्री टी. के. रॉय हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने त्यानांच प्राधिकृत करण्यात आले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २२/१२/२०१० चा माहितीचा अर्ज अमरावतीच्या जनमाहिती यांचेकडे केला होता. म्हणून अमरावतीच्या जनमाहिती यांनी दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीचा माहितीचा अर्ज पेलीस अधिक्षक, नागपूर यांचेकडे पाठविला होता. पोलीस अधिक्षक, नागपूर यांनी सदरचा माहितीचा अर्ज दि.१२/०१/२०११ ला पाठविला. त्यानंतर जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी दि.१४/०१/२०११ ला जनमाहिती अधिकारी अमरावती यांना असे कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत माजी सैनिक श्री शामदेव काशीरामजी तितरमारे यांच्या दि. २२/१२/२०१० ला आपणाकडे सादर केलेल्या अर्जाची झेरॉक्स आमचे कार्यालयास दि. १२/०१/२०११ रोजी प्राप्त झाली. सदर अर्जातील नमुद गैरअर्जदार श्री शेषराव शामराव कळसकर जिल्हा सैनिक कार्यालय अमरावती यांची माहिती पोलीस उपअधिक्षक/ पोलीस अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर यांचे कार्यालयीन पत्र दि. २३/११/२०१० अन्वये आपले कार्यालयात पाठविण्यात आली आहे. आपण वरील संदर्भांकित पत्रात पुढील कार्यवाहीस पोलीस अधिक्षक यांचे कार्यालयीन पत्र दि.२४/१२/२०१० नुसार आपणाकडे पाठविलेली आहे असे नमुद केले आहे. परंतू या तारखेचे पत्र आमचे कार्यालयाचे रेकॉर्डवर नाही. याबाबत स्पष्ट कळविण्यात यावे. जेणेकरुन आपणास माहिती पाठविण्यात येईल. तथापी जनमाहिती अधिकारी अमरावती यांचेकडून या पत्रावर जनमाहिती अधिकारी नागपूर यांचेकडे कोणतेही उत्तर प्राप्त झाले नाही. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो नागपूर सदर प्रथम अपीलाची सुनावणी घेतली आणि त्यामध्ये निर्णय देण्यात आला की, अपीलकर्ता श्री शामराव तितरमारे यांनी दिलेल्या अर्जाची स्थिती बाबतची माहिती जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी उपलब्ध करुन द्यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी अपीलार्थीस दि. ११/०३/२०११ च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण सादर केलेल्या दि.०८/११/२०१० चा अर्ज मा. महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो मुंबई यांना अवलोकनार्थ आणि पुढील आदेशार्थ सादर करण्यात आला आहे. सदरचे पत्र अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र त्यांच्याकडील दि. ०८/११/२०१० च्या तक्रार अर्जावर झालेल्या कार्यवाहीची माहिती त्यांना समाधानकारक मिळालेली नाही असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीच्या दि. ०८/११/२०१० च्या तक्रार अर्जावर महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो मुंबई यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले असून सदरच्या अर्जाच्या चौकशीचे काम पोलीस निरिक्षक श्री मिश्रा यांचेकडे दिलेले आहे. आणि त्या अर्जाची चौकशी पोलीस निरिक्षक श्री मिश्रा यांनी सुरु केलेली आहे.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि.०८/११/२०१० च्या तक्रार अर्जावर महासंचालक ॲन्टी करप्शन ब्युरो मुंबई यांनी चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत त्यानुसार सदरच्या चौकशीचे काम पोलीस निरिक्षक श्री मिश्रा यांचेकडे दिलेले दिसते म्हणून जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी ही वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आदेश

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्त्याच्या दि.०८/११/२०१० च्या तक्रार अर्जावर महासंचालक अँटी करप्शन ब्युरो मुंबई यांनी चौकशी करण्याचे आदेश दिले असून सदरच्या चौकशीचे काम पोलीस अधिक्षक श्री मिश्रा हे करित असल्याबाबतची माहिती जनमाहिती अधिकारी नागपूर यांनी हा आदेश मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३८४/नाग/२०११**

१. सौ. पुष्पा टेंभरे - **अपीलकर्ती**
न्यु खदान,बौध्द विहारजवळ, लष्करीबाग, नागपूर
ता. जि. नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
इंदुताई मेमोरीयल लार्ड कान्व्हेन्ट प्राथ. शाळा,
आवळेनगर, टेकानाका, नागपूर-२६

३. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका - **उत्तरवादी**
इंदुताई मेमोरीयल लार्ड कान्व्हेन्ट प्राथ. शाळा,
आवळेनगर, टेकानाका, नागपूर-२६

**(आदेश पारित दिनांक १८/०६/२०११)**

१. अपीलकर्ती यांनी दि. ०५/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक १८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, इंदुताई मेमोरियल लार्ड लेडी कॉन्हवेन्ट प्राथमिक शाळा नागपूर कु. इंदु भुरे उपस्थित असून त्यांच्या तर्फे ॲड. बी. एस. डोंगरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव, इंदुताई मेमोरियल लॉर्ड लेडी कॉन्व्हेन्ट तर्फे संस्थेचे सदस्य श्री अशोक हाडके हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२९/०९/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, कु. इंदु भुरे, इंदुताई लार्ड लेडी मेमोरियल कॉन्व्हेंट प्राथमिका शाळा टेका नाका, नारी रोड, नागपूर यांचेकडे एप्रील २०१० पासून ३० सप्टेंबर २०१० पर्यंत त्यांच्या शाळेत वर्ग १ ते ७ मधील विद्यार्थ्यांची पटसंख्या व पोषक, आहारासाठी सरकारकडून मिळणारे अन्न धान्य, यासंबंधित १ ते ८ रकाने तयार करुन त्या रकान्यातील नमुन्यात माहिती मागितली होती. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांचेकडून विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही मात्र ३० दिवसांच्या मुदतीनंतर दि.२३/०५/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाली. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीच्या कागदपत्रांवरती जनमाहिती अधिकारी यांच्या सहया नाहीत. म्हणून सदर माहितीवर जनमाहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरी होणे आवश्यक आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी अपीलार्थीस पाहिजे असलेल्या सर्व कागदपत्रांवर सह्या करुन सदर कागदपत्रे अपीलार्थीस उपलब्ध करुन दिले. सदर माहिती अपीलार्थीने स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. अपीलार्थीस पाहिजे असलेली संपूर्ण माहिती त्यांना उपलब्ध झाल्यामुळे अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३९६/नाग/२०११**

१. श्री वसंतराव बाजीराव उईके - **अपीलकर्ता**
मु. पो. नवेझरी
ता. तिरोडा जि. गोंदिया

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार - **उत्तरवादी**
तहसिल कार्यालय तिरोडा
ता. तिरोडा जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक २०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार तिरोडा श्री जी. एस. मेश्राम हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार तिरोडा श्री एस. बी. चंदावार हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकारा खालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा ग्राममंडळ निवडणूक अधिकारी तहसिल तिरोडा यांचेकडे दि.०२/११/२०१० रोजी ग्राममंडळ नवेझरी येथील अध्यक्ष/ उपाध्यक्ष निवडणुक प्रक्रिया संबंधात दि. २१/१०/२०१० च्या निवडणूक कालावधीतील एकूण ८ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमुद केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.०२/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार यांच्या कार्यालयाकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राममंडळ नवेझरी येथील अध्यक्ष/उपाध्यक्ष निवडणूकीच्या प्रक्रिये संबंधित एकूण १ ते८ मुद्यांवर माहिती मागितली होती परंतू त्यांना अपेक्षित माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी तहसिलदार यांचेकडे दि. २७/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सांगितले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार तिरोडा श्री मेश्राम हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/११/२०१० चा माहितीचा अर्ज तहसिलदार कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती असल्यामुळे अशाप्रकारची माहिती पुरविता येत नाही असे दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील तहसिलदार तिरोडा यांचेकडे दाखल केले. तहसिलदार तिरोडा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले होते. परंतू जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस माहिती पाठविलेली असल्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज करण्यात आले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्या नंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि.०२/११/२०१० च्या माहितीच्या अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलार्थीने नवेझरी ग्राम मंडळाच्या निवडणूकीच्या संदर्भात १ ते ८ मुद्यांची

माहिती मागितली होती. परंतू सदरची माहिती प्रश्नार्थक स्वरुपात विचारलेली असल्यामुळे माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम २ मधील व्याख्येनुसार अभिलेखाच्या स्वरुपात जी माहिती आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे अपेक्षित आहे. मात्र माहितीच्या अधिकारामध्ये मार्गदर्शन किंवा मत किंवा अभिप्राय अशा प्रकारची माहिती देणे अभिप्रेत नाही. जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२६/११/२०१० च्या पत्रान्वये पाठविलेली माहिती अपीलार्थीस मिळाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे प्रस्तुत प्रकरणी असे म्हणणे आहे की, माहिती अर्जातील मुद्या क्र. ७ हा निवडणुकीच्या संदर्भात व्हिडीयो शुटिंग करण्याबाबतचा आहे आणि त्याबाबतची माहिती त्यांना मिळणे आवश्यक आहे. या मुद्याबाबत जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, प्रस्तुत निवडणुकीच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयामार्फत कोणतेही व्हिडीओ शुटिंग करण्यात आले नाही. किंवा तशी परवानगी देखील त्यांच्या कार्यालयाने दिलेली नाही. म्हणून ही वस्तुस्थिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. ७ ला अनुसरुन प्रस्तुत व्हिडीयो शुटिंग त्यांचे कार्यालयामार्फत केलेली नाही किंवा व्हिडीयो शुटिंगची परवानगी देखील त्यांच्या कार्यालयामार्फत दिलेली नाही असे स्पष्टपणे विनामुल्य अपीलार्थीस कळवावे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३९५/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री वसंतराव बाजीराव उईके<br>मु. पो. नवेझरी<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार<br>तहसिल कार्यालय तिरोडा<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र.२६<br>नवेझरी<br>ता. तिरोडा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी साझा क्र. २६ नवेझरी ता. तिरोडा, जि. गोंदिया श्री पी. के. गऱ्हाडे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार तिरोडा श्री एस. डी. चंदावार हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा तलाठी साजा क्र.२६ नवेझरी ता. तिरोडा यांचेकडे दि.०२/११/२०१० रोजी महेन्द्र महादेव भांडारकर यांचेकडे महसूलकर असल्या बाबत दाखल्याची मागणी केली तसेच भांडारकर यांचे नावावर सामुहिक शेतीचा ७/१२ उतारा सत्यापनाची प्रत तसेच महेन्द्र भांडारकर यांचेकडे महसूल थकीत असल्या नसल्याचा दाखला मिळण्यासाठी दि. २६/१०/२०१० ला अर्ज केला असता त्यावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबतची माहिती मागितली होती. त्यानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली मात्र त्यांच्या अपेक्षेप्रमाणे माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दि.२७/१२/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा त्यांना निर्णय मिळाला नाही म्हणून अपीलार्थीने दि. २३/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा तलाठी श्री गऱ्हाडे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०२/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने श्री महेन्द्र महादेव भांडारकर यांच्या सामुहीक शेतीच्या ७/१२ चे उतारे आणि महसूलकर थकीत असल्याबाबतची माहिती मागितली होती. त्यानुसार माहिती काढण्यात आली. आणि अपीलार्थीस दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये गावनमुना ८ ब त्याचप्रमाणे ७/१२ चे उतारे आणि महसूलकर आकारणी बाबत माहितीच्या स्वरुपात त्यांच्याकडे उपलब्ध असलेला शेतसारा, अकृषक आकारणी, आणि रोजगार हमी योजना उपक्रम इ. बाबतची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. सदर माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे स्विकृत केले. मात्र अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, त्यांना सदरची माहिती ही विलंबाने प्राप्त झाली आहे. कारण नवेझरी ग्राम मंडळाच्या निवडणुकीच्या संदर्भात त्यांना सदर माहितीची आवश्यकता होती. म्हणून जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना त्वरीत ही माहिती उपलब्ध होणे आवश्यक होते. तसेच प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाचा निर्णय देखील त्यांना मिळाला नाही असे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. वास्तवीक पाहता अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर अपीलकर्ता तिरोडा यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देणे आवश्यक होते. मात्र त्यांनी या प्रकरणी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसत नाही म्हणून भविष्यात तहसिलदार तिरोडा यांनी याबाबतची पुर्नावृत्ती करु नये ह्याची समज त्यांना देण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्त्याच्या दि. ०२/११/२०१० च्या माहितीच्या अर्जास अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा तलाठी यांनी दि.३०/११/२०१० च्या पत्रान्वये त्यांच्याकडे उपलब्ध असलेले कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली दिसतात म्हणजेच ३० दिवसांचे मुदतीत अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३९७/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विनोद तुकारामजी बन्सोड<br>मु. पो. धारगांव<br>ता. जि. भंडारा | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी<br>पंचायत समिती सालेकसा<br>ता. सालेकसा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी<br>पंचायत समिती सालेकसा<br>ता. सालेकसा जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०१/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.२४/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती सालेकसा श्री वासनिक हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, यांचे तर्फे जनमाहिती अधिकारी यांना प्राधिकृत केले आहे.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२१/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी पंचायत समिती सालेकसा जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन त्याची मानीव तारिख प्रस्ताव जिल्हा परिषद गोंदिया यांचेकडे सादर करण्याची माहिती तसेच मा. लोक आयुक्त यांचे दि.०७/०७/२००९ आणि दि. २६/०४/२०१० च्या पत्रानुसार ६ व्या वेतन आयोगानुसार त्यांना वेतन न देण्याच्या कारणांची माहिती आणि श्री एस. एफ. कुरेशी यांच्या अपंगत्वाच्या प्रमाणित पत्राची प्रत इ. बाबत त्यांनी माहिती मागितली होती. तथापी त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दि.२२/१/२०११ रोजी प्रथम अपील खंड विकास अधिकारी, पंचायत समिती सालेकसा यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती श्री वासनिक यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २१/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२३/१२/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयातील आस्थापना शाखेतील वरिष्ठ सहायक श्री आर. डी. बिसेन यांचेशी संबंधित असल्यामुळे ती माहिती त्यांच्याकडून प्राप्त करुन घेण्यासाठी श्री बिसेन यांना दि.२७/१२/२०१० च्या पत्रान्वये कळविले. तसेच दि.०४/०२/२०११ आणि दि.३०/०३/२०११ रोजी पुन्हा पत्र दिले. त्यानंतर श्री आर. डी. बिसेन यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. आणि त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०६/०६/२०११ च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांचेकडून पाठविण्यात आलेली माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र सदर माहिती ३० दिवसांचे मुदतीत न देता विलंबाने उपलब्ध करुन दिल्याचे सांगितले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, अपीलार्थीचे प्रथम अपील खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सालेकसा यांचेकडे प्राप्त झाले नाही म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही. त्याबाबत प्रथम अपील पंचायत समिती कार्यालयात प्राप्त झाले नसल्याचा संबंधित विभागाचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला.

४.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीच्या दि. २१/१२/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०६/०६/२०११ च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती ही आस्थापना शाखेतील श्री आर. डी. बिसेन वरिष्ठ सहाय्यक यांनी ३० दिवसांचे मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे सादर केले नाही. श्री बिसेन यांनी सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडे दि.०४/०६/२०११ च्या पत्रानवये उपलब्ध करुन दिलेली दिसते या विलंबा बद्दल श्री बिसेन यांना विचारणा केली असता त्यांनी आयोगापुढे सांगितले की, कार्यालयीन कामकाजाच्या व्यस्ततेमुळे त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडे मुदतीत माहिती देता आली नाही. तथापी श्री बिसेन यांचा विलंबा बाबतचा खुलासा हा मान्य करण्यासारखा नाही त्यामुळे श्री बिसेन हे विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांना माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिल्याबाबत अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२.	श्री आर. डी. बिसेन, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती सालेकसा यांनी अपीलकर्त्याच्या दि.२१/१२/२०१० च्या अर्जानुसार ३० दिवसांचे आत माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर दि.०४/०६/२०११ च्या पत्रान्वये सदरची माहिती जनमाहिती यांचेकडे उपलब्ध करुन दिल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी दि. ०६/०६/२०११ च्या पत्रान्वये सदर माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली म्हणून श्री आर. डी. बिसेन हे सदर विलंबास जबाबदार दिसून येतात. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ५ (५) नुसार श्री बिसेन यांना जनमाहिती अधिकारी असे समजण्यात येत असून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम २० (१) अन्वये रु. ५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे.

३. सदरच्या शास्तीची वसूली संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती सालेकसा यांनी श्री बिसेन यांचे दरमहाचे वेतनातून करुन ती लेखाशिर्ष "००७० - इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१) " मध्ये जमा करावी.

४. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४०३/नाग/२०११, ४०४/नाग/२०११, ४०५/नाग/२०११**

१. श्री तुळशीराम परशुरामकर - **अपीलकर्ता**
मु. पो. खोडशिवनी
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती सडक /अर्जुनी
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत खोडशिवनी
ता. सडक /अर्जुनी जि. गोंदिया

**(आदेश पारित दिनांक २१/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये अपील क्र. ४०३/२०११, ४०४/२०११ आणि ४०५/२०११ अशी ३ द्वितीय अपीले दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २१/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत खोडशिवनी, ता.जि. सडक/अर्जुनी गोंदिया श्री एल. जे. कुंभरे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सडक/अर्जुनी जि. गोंदिया डॉ. बबन कांबळे हजर आहेत.

२. प्रस्तुत प्रकरणी वर नमुद केलेल्या तीनही अपीलांमध्ये अपीलकर्ता व उत्तरवादी हे एकच असल्यामुळे या तीनही अपीलांची सुनावणी आयोगापुढे एकत्रीत घेण्यात आली. आणि तीनही अपीलांचा खालीलप्रमाणे निर्णय निर्गमित करण्यात आला.

**अपील क्र. ४०३/२०११ -**

अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २२/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, खोडशिवनी ता. सडक अर्जुनी जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन पुढीलप्रमाणे दोन मुद्यांवर माहिती मागितली होती.

१) ऑक्टोबर २००७ पासून बाथरुमचे पाणी ग्रामपंचायतीने बांधलेल्या नालीत सोडू नये अशा नोटीसा अनेकांना देण्यात आल्यात सबब याबाबतचा कायदा असल्यास त्याची प्रत द्यावी.

२) तुळशीराम परशुरामकर खोडशिवनी यांच्या बाथरुमचा पाणी जाणारा पाईप ६ महिन्यापूर्वी काढला. फक्त एकाच व्यक्तीचा पाईप काढल्याबाबत माहिती देण्यात यावी, अशी माहिती अपीलार्थीने मागितलेली आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जानुसार दि.२१/१०/२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १४/१२/२०१० ला प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सडक अर्जुनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि.१२/०१/२०११ रोजी घेण्यात आली आणि दि. ०४/०२/२०११ ला निर्णय निर्गमित केला. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

४. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सचिव, श्री एल. जी. कुंभरे ग्राम पंचायत खोडशिवनी जि. गोंदिया हे उपस्थित असून त्यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/०९/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने एकूण २ मुद्यांवर माहिती मागितलेली होती.

त्या दोनही मुद्यांची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यावर श्री तुळशीराम महारु परशुरामकर यांच्या बाथरुमचे पाणी जाणारा पाईप ज्याप्रमाणे काढला त्याप्रमाणे इतर ३५ लोकांचे बाथरुमचे पाईप काढण्यात आले नाही असे अपीलार्थीने सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, तुळशीराम महारु परशुरामकर यांच्या बाथरुमचा पाईप ग्रामपंचायतीने काढलेला नसून हा त्याच गावातील लोकांनी काढलेला आहे. आणि त्या बाबतचे पत्र गावातील लोकांनी ग्राम पंचायतीला दिले आहे व त्याची प्रत अपीलार्थीस पुरविलेली आहे. तसेच मुद्या क्र. १ च्या संदर्भात मुंबई ग्राम पंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ च्या झेरॉक्सची प्रत सोबत जोडून पाठविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलार्थीने संवर्ग विकास अधिकारी सडक अर्जुनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्याची सुनावणी घेण्यात आली आणि निर्णय देण्यात आला. त्या निर्णयामध्ये श्री परशुरामकर यांच्या म्हणण्यानुसार त्यांच्या बाथरुमचा पाईप हा ग्रामपंचायतीने काढलेला नसून गावातील लोकांनी काढलेला आहे व तसे गावकऱ्यांचे लेखी पत्र ग्राम पंचायतीकडे आहे. म्हणून ग्राम पंचायतीने घेतलेल्या ठरावानुसार व पंचायत समिती कार्यालयाने केलेल्या चौकशी नुसार कार्यवाही करावी असा निर्णय प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असल्याचे श्री कांबळे यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलार्थीस जनमाहिती अधिकारी यांनी दि.२२/०९/२०१० च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि.२१/१०/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार ग्राम पंचायतीने प्रस्तुत प्रकरणी कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलार्थीचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**अपील क्र. ४०४ /२०११ -**

७. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २२/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत खोडशिवनी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन पुढील दोन मुद्यांवर माहिती मागितली आहे.

१) खोडशिवनी ग्राम पंचायतीने ऑक्टोबर २००७ पासून आणलेल्या रेती मुरुम गिट्टीची संपूण्र माहिती दरासहीत द्यावी तसेच पेमेंट कोणाला केले त्याची रॉयलटी भरल्याची माहिती द्यावी.

२) पाणी पुरवठा योजनेचे टाकीचे बंद केलेले काम पुन्हा चालू करण्याबाबतचा संपूर्ण दस्तऐवजासह माहिती मागितलेली होती.

त्यानुसार अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि.२१/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध झाली परंतू सदर माहिती ही अपूर्ण असल्यामुळे त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे दि.१४/१२/२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आला आणि त्यामध्ये अपीलार्थीस संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात आले. परंतू प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

८. जनमाहिती अधिकारी श्री कुंभरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेल्या दोनही मुद्यांची माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मात्र मुद्या क्र. १ च्या संदर्भात अपीलार्थीस दि.२१/१०/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, कोणत्या योजने अंतर्गत व कोणत्या कामासाठी रेती, गिट्टी, मुरुम यांचा पुरवठा करण्यात आला याचा तपशिलवार उल्लेख आपण माहिती अर्जात केला नाही त्यामुळे आपल्याला नेमकी कोणती माहिती हवी आहे याबद्यल कळवावे. तसेच मुद्या क्र.२ बाबत पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात परिक्षण अहवालाची झेरॉक्स प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली. मात्र त्या माहितीमध्ये ग्राम पंचायतीने टाकीचे बांधकाम केल्याबाबतची कागदपत्रे त्यांना उपलब्ध झाली नाही. तसेच रॉयलटी भरण्याबाबतची माहिती अपीलार्थीस मिळालेली नाही आणि ग्रामपंचायतीने बांधकामाबाबत जो ठेका दिला त्या बाबतचा ग्राम पंचायतीचा ठराव त्यांना

मिळाला नाही असे त्यांनी सुनावणीचेवेळी सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, टाकीच्या बांधकामा संदर्भात ग्रामपंचायतीमध्ये फक्त टेस्ट रिर्पोर्टची प्रत उपलब्ध आहे. त्याची प्रत अपीलार्थीस देण्यात आली. तसेच रॉयलटीचा भरणा हा ठेकेदार करीत असतो त्यामुळे रॉयलटीची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही आणि ग्राम पंचायतीने बांधकामाबाबत जो ठेका दिला आहे त्याबाबतची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>अपील क्र.४०५/२०११ -</u>**

९. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २७/०९/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्राम पंचायत खोडशिवनी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन म. गांधी तंटामुक्त गाव समिती खोडशिवनी यांनी केलेल्या खर्चाबाबतची १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दि. २६/१०/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली मात्र सदरची माहिती ही समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती सडक / अर्जुनी यांचेकडे दाखल केले. आणि प्रथम अपीलाच्या निर्णयात मुद्या क्र. ४ ची संपूर्ण माहिती देण्याबाबतचे निर्देश देण्यात आले. परंतू त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

१०. जनमाहिती अधिकारी तथा सचिव श्री कुंभरे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. २६/१०/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे माहिती अर्जातील मुद्या क्र. ४ ची माहिती देखील उपलब्ध करुन दिलेली आहे सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले. मात्र ग्राम सभेत दि. १५/०८/२००९ ला खर्चास मंजुरी देण्यात आली त्याची प्रत त्यांना मिळालेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले की, दि. १५/०८/२००९ ला ग्राम पंचायत खोडशिवनीची ग्रामसभा घेण्यात आली परंतू या ग्रामसभेत कोणतीही जमा खर्चाची मंजुरी देण्यात आली नाही. किंवा या प्रकारचा

कोणताही विषय या सभेत घेण्यात आला नाही अशी माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे तसेच अपीलकर्त्यास एकूण खर्च रु. ६८१६५/- च्या संपूर्ण बिलांच्या झेरॉक्स प्रती देखील देण्यात आल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र त्या बाबत अपीलार्थीचे असे म्हणणे आहे की, झालेल्या खर्चाच्या काही बीलांवर सह्या नाहीत. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, ग्राम पंचायत कार्यालयात ज्या स्थितीत बिले उपलब्ध होती त्याच स्वरुपात ती अपीलार्थीस देण्यात आली आहेत.

११. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ४०३/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती सडक/अर्जुनी यांनी प्रथम अपीलातील दिलेल्या निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत यांनी प्रस्तुत प्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी.

३. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ४०४/२०११ हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन द्यावी.

अ) उपविभागीय अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा, उपविभाग जिल्हा परिषद नवेगाव बांध यांचेकडील दि.१४/०३/२०११ च्या पत्रानुसार ग्राम पंचायत कार्यालयात पाण्याच्या टाकीचे बांधकाम बाबत फक्त टेस्ट रिपोर्ट उपलब्ध आहे इतर कागदपत्रे उपलब्ध नाहीत असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास कळवावे.

ब) रॉयलटीच्या प्रकरणांबाबतची माहिती ग्राम पंचायत कार्यालयाकडे उपलब्ध नाही असेही कळवावे.

क) ग्राम पंचायतीने बांधकामाबाबत ठेका दिलेल्या ग्राम पंचायतीच्या ठरावाची प्रत अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. अपीलकर्ता यांचे अपील क्र. ४०५/२०११ हे खारीज करण्यात येते.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४१२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री कवडू मारोती ढवळे<br>रा. दहेगांव<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु द्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती वरोरा<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>पंचायत समिती दहेगांव<br>ता. वरोरा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १२/०१/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, दहेगांव कु. भाग्यश्री देवतळे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती वरोरा यांचे तर्फे श्री फुलझेले हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २३/०६/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती वरोरा, ता. वरोरा जि. चंद्रपूर

यांचेकडे अर्जदार दहेगाव ग्रामपंचायत दहेगाव येथे चपराशी म्हणून काम करित होते त्यांना दि.१७/०९/२००४ ते दि.३१/०३/२००५ पर्यंत विना आदेशाने किंवा विना ठरावाने कामावरुन काढून टाकले त्याबाबतची माहिती त्यंनी मागितली होती. त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. १४/०९/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत दहेगाव कु. भाग्यश्री देवतळे यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडून त्यांच्या कार्यालयाकडे दि. ०३/०८/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलकर्ता हे पूर्वी ग्रामपंचायत कार्यालयाकडे शिपाई या पदावर कार्यरत होते. परंतू त्यांची दृष्टी कमी झाल्यामुळे ग्राम पंचायतीने त्यांना कामावरुन कमी केले होते. अपीलार्थीच्या माहिती अर्जात मात्र असे नमुद केले आहे की, दि. १७/०९/२००४ ते दि.३१/०३/२००५ या कालावधीत अपीलार्थीस कामावरुन कमी केले होते त्या ठरावाची प्रत अपीलार्थीने मागितली होती. परंतू त्यांना कामावरुन कमी केल्याचा कोणताही ठराव किंवा आदेश ग्रामपंचयतीने वरील कालावधीत घेतलेला नाही. त्याबाबत दि. १६/०८/२०१० च्या पत्रान्वये अपीलार्थीस कळविण्यात आले असल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले कक्ष अधिकारी पंचायत समिती वरोरा श्री फुलझले यांनी आयोगापुढे सांगितले की, दि.२३/०६/२०१० चा माहितीचा अर्ज प्रथमतः पंचायत समिती यांचेकडे प्राप्त झाला होता. मात्र सदरची माहिती ग्राम पंचायत दहेगाव यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी सदर माहितीचा अर्ज सचिव ग्रामपंचायत यांचेकडे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी हस्तांतरीत केला होता. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील दाखल केले. परंतू जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे प्रथम अपील फेटाळण्यात आल्याचे श्री फुलझेले यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे ग्राम पंचायत कार्यालय दहेगाव येथे शिपाई पदावर कर्यरत होते. त्यांना . दि. १७/०९/२००४ ते दि.३१/०३/२००५ या कालावधीत कामावरुन कमी करण्यात आले होते. या कालावधीत ग्रामपंचायतीने त्यांना कामावरुन कमी करण्याबाबत कोणताही ठराव घेतलेला नाही. मात्र ग्राम पंचायतीने यापूर्वीच दि. २६/०८/२००४ च्या सभेत शिपाई या पदावरुन कमी करण्याचा ठराव केलेला दिसून येतो. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दि.२६/०८/२००४ च्या ठरावाची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्याचे आयोगापुढे मान्य केले. आणि अपीलार्थीस या ठरावाची प्रत आज आयोगासमोर त्यांना देण्यात आली. अपीलार्थीस आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळेअपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

## अपील क्र.४१३/नाग/२०११

१. श्रीमती नंदाबाई सुखराम शेंडे - **अपीलकर्ती**
C/o, प्रदिप श्रावण कांबळे, गिट्टीखदान, आझाद नगर,
राजपाल किराणा स्टोर्स जवळ, काटोल रोड, पो. पोलीस लाईन, नागपूर

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी - **उत्तरवादी**
पंचायत समिती पारशिवनी
ता. पारशिवनी जि. नागपूर

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव - **उत्तरवादी**
ग्राम पंचायत कन्हान (पिपरी)
ता. पारशिवनी जि. नागपूर

## (आदेश पारित दिनांक २२/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ०५/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ती हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत, कन्हान (पिपरी) श्री भारत मेश्राम हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी, पंचायत समिती पारशिवनी यांचे तर्फे अधिक्षक श्री देवराव तोडासे हजर आहेत.

२.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २५/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत कन्हान (पिंपरी) पारशिवनी यांचेकडे विवेकानंद नगर मधील घर क्र. १५२ च्या बाबत कर आकारणी रजिस्टर नक्कल मध्ये दाखविलेले क्षेत्रफळ असमाधानकारक असल्याबाबत माहिती विचारली आणि सदरचे घर क्र. १५२ या मध्ये भोगवटा करणाऱ्यांच्या नावामध्ये नंदाबाई सुखराम शेंडे आणि फुलनबाई सुखराम शेंडे ही दोन नावे दर्शविण्यात आली आहेत. मात्र सदरचे घर क्र. हे नंदाबाई सुखराम शेंडे यांचे असतांना तयामध्ये पुन्हा फुलनबाई सुखराम शेंडे यांचे नाव कोणत्या कागदपत्रांच्या आधारे नोंदविण्यात आले आहे त्याची माहिती मागितली असता जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू घर क्र. १५२ चे क्षेत्रफळ २००५-२००६ च्या कर आकारणी यादी मध्ये ९०० चौ. फुट दाखविलेली आहे म्हणून ही विसंगती कशाबाबत आहे याची माहिती त्यांना मिळालेली नाही त्यासाठी अपीलार्थीने संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती पारशिवनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत कन्हान श्री भारत मेश्राम  यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. २५/११/२०१० च माहितीचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाला होता अपीलार्थीस पाहिजे असलेली माहिती त्यांनी तयार केली होती . परंतू अपीलार्थीने सदर माहिती घेण्यास नकार दिला असे जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी आयोगापुढे सांगितले. मात्र अपीलार्थीचे म्हणणे असे आहे की, माहिती घेण्यासाठी त्या कार्यालयात गेल्या होत्या मात्र त्यांना माहिती मिळाली नाही. त्यानंतर ग्राम पंचायत कार्यालयातून त्यांना सन २००५-२००६ आणि आणि २०१०-११ च्या कर आकारणीची यादी अपीलार्थीस संबंधित लिपीकाने उपलब्ध करुन दिल्याचे जनमाहिती यांनी सांगितले. अपीलकर्त्यास सदरची माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र क्षेत्रफळाबद्यल आणि फुलनबाई सुखराम शेंडे याचे नाव घर क्र. १५२ मात्र कोणत्या कागदपत्रांच्या आधारे लागले याची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी सांगितले. म्हणून सदरची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत कन्हान (पिंपरी) यांनी अपीलकर्त्यास खालीलप्रमाणे विनामुल्य माहिती व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

अ)	घर क्र. १५२ अ मधील सन २०१०-११ च्या कर आकारणी रजिस्टरमध्ये ३२५ चौ. फुट कर आकारणी दाखविलेली आहे मात्र सदरची कर आकारणी ही फक्त बांधकाम क्षेत्रफळावर करण्यात आलेली आहे. असे स्पष्टपणे अपीलार्थीस विनामुल्य कळवावे.

ब)	घर क्र. १५२ अ मध्ये सन २०१०-११ च्या कर आकारणी रजिस्टरमध्ये मालकाचे नाव व भोगवटा करणाऱ्यांचे नाव नंदाबाई सुखराम शेंडे आणि फुलनबाई सुखराम शेंडे अशी दोन नावे दर्शविलेली आहे. म्हणून सदरच्या मालमत्तेत फुलनबाई सुखराम शेंडे यांचे नाव कोणत्या कागदपत्रांच्या आधारे लावण्यात आले आहे. याची विनामुल्य माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

ड)	सन २००५-०६ च्या कर आकारणीत सदरचा घर क्रमांक १५२ च नोंदविलेले आहे मात्र सन २०१०-२०११ च्या कर आकारणीत मात्र घर क्र.१५२ अ दर्शविलेला आहे याबाबतही अपीलार्थीस वस्तुस्थिती विनामुल्य कळवावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४१०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री ग्यानिराम मार्तंड जांभुळकर<br>मु. देऊळगांव (बो.) पो. बोंडगाव (देवी)<br>ता. अर्जुनी (मोर) जि. गोंदिया | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी<br>पंचायत समिती अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी (मोर) जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक<br>पंचायत समिती अर्जुनी/मोर.<br>ता. अर्जुनी (मोर) जि. गोंदिया | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २२/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०८/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २२/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत समिती अर्जुनी/मोर जि. गोंदिया आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंडविकास अधिकारी, पंचायत समिती यांचे तर्फे विस्तार अधिकारी श्री व्ही. जे. भुरे हजर आहेत.

२.        अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.२५/११/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, पंचायत समिती  यांचेकडे त्यांच्या आस्थापनेवरील सर्व अधिकारी कर्मचारी, त्यांचे वेतन भत्ते, अधिकार आणि कर्तव्य व त्यांना उपलब्ध असलेल्या सोयी सुविधा, आणि पंचायत समिती मधील विषय समित्यांची सन १९८१ पासून ते २०१० पर्यंतची माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दि. ०६/१२/२०१० च्या पत्रान्वये असे कळविण्यात आले की, आपणास नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत उलगडा होत नसल्यामुळे माहिती पुरविण्यास अडचण निर्माण होत आहे तरी आपण कार्यालयीन वेळेत प्रत्यक्ष उपस्थित राहून आपणास कोणती माहिती पाहिजे आहे याबाबत कळवावे असे कळविल्याचे अपीलार्थीने सांगितले. त्यानुसार जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती यांचे कार्यालयात प्रत्यक्ष हजर झालो असता कोणतीही माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही असेही अपीलार्थीने सांगितले. म्हणून  खंडविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतू प्रथम अपीलाचाही निर्णय देण्यात आला नाही. म्हणून आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलार्थीने सांगितले.

३.        जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक यांच्या वतीने उपस्थित असलेले श्री व्ही. जे. भुरे विस्तार अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२५/११/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२६/११/२०१० ला प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही व्यापक स्वरुपाची असून सर्वच कर्मचारी /अधिकारी व त्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सोयीसुविधा, वेतन भत्त्यांची तसेच विषय समित्यांची आहे. तसेच सदर माहिती ही सन १९८१ ते २०१० पर्यंतची सुमारे ३० वर्षाची आहे आणि व्यापक प्रमाणात मागितलेली आहे त्यामुळे  नेमकी कोणती माहिती अपीलार्थीस पाहिजे आहे याचा बोध होत नाही म्हणून दि. ०६/१२/२०१० ला पत्र लिहून अपीलार्थीस माहितीची विचारणा करण्याबाबत कार्यालयात बोलविले. त्यानुसार अपीलकर्ता हे कार्यालयात उपस्थित झाले. अपीलकर्त्यास कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती  देण्यात आली. सदर माहिती अपीलकर्त्यास पुरविल्याबाबतची पोच अपीलार्थीकडून घेण्यात आली त्याचा पुरावा म्हणून सदर पोच ही आयोगापुढे श्री भुरे यांनी दाखविली. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना जनमाहिती अधिकारी

यांचेकडून कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नाही. त्यानंतर अपीलार्थीने खंडविकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी ठेवण्यात आली होती परंतू प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही.

वास्तविक पाहता प्रथम अपील दाखल झाल्यानंतर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपीलाचा निर्णय ३० दिवसांचे आत निर्गमित करणे आवश्यक असते मात्र खंडविकास अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात त्यांनी याबाबतची पुर्नावृत्ती करुन नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री भुरे यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही. परंतू अपीलार्थीने मागितलेली माहिती ही सन १९८१ ते २०१० पर्यंतची म्हणजेच सुमारे ३० वर्षाची आहे त्यामुळे अपीलार्थीने मागितलेल्या माहितीची व्याप्तीही मोठया स्वरुपात असल्यामुळे अपीलार्थीस त्यांनी कर्मचाऱ्यांच्या वेतन भत्त्याविषयीची माहिती ही ६ वे वेतन आयोग मंजूर झाल्यानंतर उपलब्ध करुन देण्याचे भुरे यांनी मान्य केले. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या अधिकार व कर्तव्य याबाबतची माहिती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे श्री भुरे यांनी मान्य केले. आणि पंचायत समित्यातील विशेष समित्यांच्या माहिती बाबत आणि आयोग व निवड समित्यांबाबतची वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविण्याबाबत देखील श्री भुरे यांनी मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

P.T.O.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस सहावा वेतन आयोग मंजूर झाल्यानंतर वेतन व भत्त्यांची माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकार व कर्तव्य बाबतची माहिती उपलब्ध करुन द्यावी आणि पंचायत समिती मधील विशेष समित्यांची माहिती आणि आयोग व निवड समित्यांच्या माहिती बाबत वस्तुस्थिती अपीलार्थीस विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४१९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुदाम तुकारामजी चापले<br>कात्यायणी रुग्णालयामागे, बालाजी वार्ड, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक<br>भूमि अभिलेख कार्यालय, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक<br>भूमि अभिलेख कार्यालय, चंद्रपूर<br>ता. जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २३/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ०९/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २३/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख, चंद्रपूर श्री एस. जे. गौरकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा भूमि अभिलेख कार्यालय चंद्रपूर पद रिक्त असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यभार आहे.

२.	अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. १६/१२/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे बालाजी वार्ड सीट नं. ७ प्लॉट. नं. २४ मध्ये श्री सुरेश का मेढी यांची १२८२ चौ. फुट जागा असतांना सन ९६९७ च्या खसऱ्यात २५६५ व १९९८-९९ च्या खसऱ्यात ३९०० चौ. फुटाची नोंद घेतली म्हणून श्री सुरेश मेंढी यांची १२८९ चौ. फुट जागे पैकी किती जागा विकली त्याच्या फेरफाराच्या प्रति मागितलेल्या दिसून येतात. त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला नाही. म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे मोजणी केलेल्या नकाशाची झेरॉक्स प्रत मागितली होती. तसेच दि. ०५/१२/२००९ ची मोजणी केली ती आखिव पत्रिकेप्रमाणे केली नाही. म्हणून त्यांना मोजणी केलेल्या नकाशाची प्रत पाहिजे आहे परंतू त्यांना मोजणीची नक्कल मिळाली नाही म्हणून त्यांनी अपील दाखल केले.

४.	जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भुमि अभिलेख श्री गौरकर यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दि. १६/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला नाही. मात्र अपीलार्थीने प्रथम अपील अधिक्षक, भूमि अभिलेख यांचेकडे दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या प्रथम अपीलाच्या नोटीस बरोबर दि. २५/०१/२०११ रोजी अपीलार्थीचा माहितीचा अर्ज प्राप्त झाला. त्या अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. १५/०२/२०११ रोजी सुनावणी घेतली. त्या सुनावणीस अपीलकर्ता हजर होते. त्यावेळी प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्यामध्ये अपीलार्थीने मोजणीची नक्कल पाहिजे असल्यास विहीत मुदतीत फी चा भरणा करुन मोजणीची नक्कल प्राप्त करुन घ्यावी असे नमुद करुन सदरचे प्रथम अपील खारीज केले. परंतू अपीलकर्त्याने मोजणीची नक्कल फी भरणा केली नाही. म्हणून अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे अपीलार्थीस मोजणीची नक्कल पाहिजे आहे. परंतू सदर नकलेची झेरॉक्स प्रत दिली तरी अपीलार्थीस ती मान्य आहे असे अपीलकर्त्याने जनमाहिती अधिकारी यांचे समक्ष सांगितले. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी मोजणीची नक्कल झेरॉक्स च्या स्वरुपात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मोजणीच्या नक्कलेची झेरॉक्स प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.३६३/नाग/२०११**

१. श्री पँथर प्रकाश बन्सोड, अध्यक्ष, भारतीय दलित पँथर - **अपीलकर्ता**
पँथर मुख्यालय, उंटखाना चौक, डॉ. भदंत आनंद कौसल्यायन मार्ग, नागपूर
ता. जि. नागपूर - ४४० ००९

**वि रु ध्द**

२. प्रथम अपीलीय अधिकारी - **उत्तरवादी**
प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे कार्यालय,
सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

३. **जनमाहिती अधिकारी** - **उत्तरवादी**
( i) अवर सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय मुंबई-३२
(ii) प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे कार्यालय, सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२
(iii) कक्ष अधिकारी, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय मुंबई-३२
(iv) उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई-३२
(v) उपसचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई -३२
(vi) उपसचिव, पर्यटन विभाग, मंत्रालय मुंबई-३२

## (आदेश पारित दिनांक २८/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२.        अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि. १०/०६/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, मा. मुख्यमंत्री मुंबई महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय मंत्रालय मुंबई यांच्या कार्यालयात अर्ज सादर करुन राज्याचे मुख्यमंत्री, ना. अशोकरावजी चव्हाण यांनी विधी मंडळ अधिवेशनाच्या अखेरच्या दिवशी विधी मंडळात जाहीर कार्यक्रमांची घोषणा २३ डिसेंबर २००९ रोजी नागपूरात करण्यात आली त्या संबंधाने एकूण १ ते ४ मुद्यांवर माहिती मागितली होती. परंतू त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य विभाग यांचे कार्यालय मंत्रालय मुंबई यांचेकडे दि.२४/०८/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय अपीलार्थीस प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.        आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय मुंबई श्री देशपांडे, तसेच जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी सांस्कृतिक व पर्यटन विभाग श्री डमाळे, तसेच श्री संतोष खामकर (सांस्कृतिक कार्य) आणि उच्च व तंत्र शिक्षण विभाग श्री हनुमंत बोखारे हे उपस्थित आहेत.

४.        जनमाहिती अधिकारी तथा अवर सचिव, मा. मुख्यमंत्री सचिवालय मंत्रालय मुंबई श्री देशपांडे तसेच यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्त्याचा दि. १०/०६/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.२१/०६/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही प्रधान सचिव (सांस्कृतिक कार्य विभाग) यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांनी सदरचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २२/०६/२०१० च्या पत्रान्वये हस्तांतरण केला होता. सदर माहितीचा अर्ज प्रधान सचिव, सांस्कृतिक कार्य यांचेकडे दि.२३/०६/२०१० ला प्राप्त झाला. म्हणून जनमाहिती अधिकारी श्री खामकर सांस्कृतिक कार्य विभाग यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीने मागितलेली माहिती ही ३ विभागाशी संबंधित होती म्हणून त्यांनी दि.१२/०७/२०१० च्या पत्रान्वये सदरचा माहितीचा अर्ज उच्चतंत्र शिक्षण विभाग आणि पर्यटन विभाग यांचेकडे पाठवून माहिती अर्जातील मुद्या क्र.१ हा पर्यटन विभागाशी संबंधित असल्यामुळे अपीलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे त्यांनी कळविले. तसेच मुद्या क्र. २ व ४ हे नगर विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे आणि मुद्या क्र. ३ हा उच्च व तंत्र शिक्षण विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कार्यालयाकडे सदरचा माहितीचा अर्ज पाठवून माहिती अपीलार्थीस

उपलब्ध करुन देण्याचे कळविले व त्याची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन देऊन संबंधित जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधावा असे कळविले.

५. अपीलकर्ता यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी पर्यटन विभाग मंत्रालय मुंबई यांनी अपीलार्थीस दि. १८/०२/२०११ च्या पत्रान्वये मुद्या क्र.१ च्या माहिती बाबत असे कळविले आहे की, फुटाळा तलाव पर्यटन विकासाचा रु. २६७.९७ लाख इतक्या रकमेचा आराखडा पर्यटन विभागात प्राप्त झाला असून सन २०१०-२०११ च्या प्रादेशिक पर्यटन योजने करिता निधी देण्याच्या प्रस्तावामध्ये याचा समावेश करण्यात आला आहे याकरिता पर्यटन विभागा मार्फत अद्याप पर्यंत निधी मंजूर करण्यात आला नाही. सदरची माहिती अपीलार्थीस उपलब्ध झाल्याचे त्यांनी सुनावणीचेवेळी मान्य केले. मात्र अपीलार्थीचे त्याबाबत असे म्हणणे आहे की, आराखडयात बुध्दीष्ठ थिम पार्टचा उल्लेख नाही म्हणून त्या बाबत त्यांना माहिती उपलब्ध होणे आवश्यक आहे. मात्र रु. २६७.९७ लाख फुटाळा तलाव विकासा मध्ये बुध्दीष्ठ थिम चा उल्लेख नसल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. त्यामुळे ही वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविणे योग्य होईल.

त्यानंतर जनमाहिती अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांनी दि.१७/०३/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीस मुद्या क्र. ३ बाबत कळविले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यासाठी सन २०१०-२०११ च्या आर्थिक वर्षासाठी रु. १ कोटी सामाजिक न्याय विभागाने उपलब्ध करुन दिले असून उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन ज्ञापन दि.१५/०३/२०११ नुसार खर्चाचे आदेश निर्गमित केले आहेत अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलार्थीस प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगापुढे मान्य केले. मात्र १ कोटी रुपयांमधून झालेल्या खर्चाचा तपशिल अपीलार्थीस उपलब्ध झाला नाही असे अपीलार्थीने सुनावणीचेवेळी सांगितले. म्हणून रु. १ कोटी मधून झालेला खर्चाचा तपशिल संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस पाठविणे संयुक्तिक होईल. त्याचप्रमाणे अपीलार्थीने मागितलेल्या माहितीतील मुद्या क्र.२ व ४ हा नगर विकास विभागाशी संबंधित असल्यामुळे त्या मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी, सांस्कृतीक कार्य विभाग यांनी नगर विकास विभागाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी, पर्यटन विभाग यांनी अपीलार्थीस फुटाळा तलाव पर्यटन विकासासाठी रु. २६७.९७ लाख आराखडा प्राप्त  झाल मात्र त्यात बुध्दीष्ठ थिम पार्टचा आराखडा दिसत नाही असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास विनामुल्य कळवावे.

२. जनमाहिती अधिकारी उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत मुद्या क्र.३ बाबत १ कोटी निधीतून झालेल्या खर्चाचा तपशिल संबंधित विभागाकडून प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावा.

३. जनमाहिती अधिकारी सांस्कृतिक कार्य विभाग यांनी अपीलकर्त्याच्या माहिती अर्जातील मुद्या क्र. २ व ४ ची माहिती नगर विकास विभागाकडून प्राप्त करुन घेऊन हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत अपीलार्थीस विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

४. अपीलार्थीचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. म्हणून याबाबत भविष्यात प्रथम अपील दाखल झाल्यानंतर मुदतीचे आत प्रथम अपीलाचा निर्णय देण्याची समज प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

५. अपीलकर्ता व उत्तरवादी  यांना निर्णयाची  प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ  नागपूर  यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३६२/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री पँथर प्रकाश बन्सोड<br>अध्यक्ष, भारतीय दलित पँथर<br>पँथर मुख्यालय, उंटखाना चौक, डा. भदंत आनंद कौसल्यायन मार्ग, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४४० ००९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ<br>रविन्द्र नाटय मंदिर इमारत, दुसरा माळा, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार<br>सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ००२५ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ<br>रविन्द्र नाटय मंदिर इमारत, दुसरा माळा, पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार<br>सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ००२५ | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २८/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २८/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ, मुंबई श्रीमती शिला पवार प्रभारी अधिक्षिका हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ, मुंबई श्री सुरेश वांदीले, सचिव हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०७/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ मुंबई यांचेकडे आपल्या मंडळाने महात्मा फुले समग्र वाङमय या पुस्तकाची पाचवी सुधारित आवृत्ती २८ नोव्हेंबर १९९१ रोजी प्रकाशित केली या पुस्तकाचे संपादक डॉ. फडके हे आहेत. या पुस्तकातील / ग्रंथातील पान नं. ४२५ प्रकरण क्र. २० सार्वजनिक सत्यधर्म या पृष्ठापासून सम्मिलत आहे. या पुस्तकाचे लेखक सार्वजनिक सत्यधर्म सत्यशोधक समाज संस्थापक कै. महात्तमा ज्योतीराव गोविंदराव फुले हे आहेत. या पुस्तकात कै. रावबहादुर विश्रामरावजी घुले यांची प्रस्तावना माहे नोव्हेंबर १८८९ या तारखेची जोडलेली आहे. परंतु ही प्रस्तावना वरील पाचव्या आवृत्तीत समाविष्ट असल्याचे आढळत नाही म्हणून या पुस्तकातील प्रस्तावना गाळल्या संबंधात घेतलेल्या निर्णयाची कारणे आणि तो निर्णय ज्या बैठकीत झाला त्या बैठकीच्या इतीवृत्तांची साक्षांकित प्रत. सदर प्रस्तावना गाळल्याबाबत कोणकोणत्या कार्यालयीन प्रक्रिया करण्यात आल्या इ. ४ मुद्यांवर माहिती मागितली होती.

जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. १६/११/२०१० च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिली. परंतू सदर माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी दि. १८/११/२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय देखील प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृतीक मंडळ मुंबई श्रीमती शिला पवार, प्रभारी अधिक्षिका यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ०७/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. २०/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात संचालक शासनमुद्रण लेखन सामग्री व प्रकाशन संचालनालय मुंबई यांना पत्र पाठवून तसेच त्यांच्या कार्यालयात व्यक्तीशः जावून अपीलार्थीने मागितलेली माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अपीलार्थीस दि. १६/११/२०१० च्या पत्रान्वये आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र त्या माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सचिव यांचेकडे केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०५/०१/२०११ च्या पत्रान्वये अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात सविस्तर उत्तर पाठविले. जनमाहिती अधिकारी यांचेकडील दि. १८/१०/२०१० चे पत्र आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडील दि.०५/०१/२०११ चे पत्र त्यांनी

सुनावणीचेवेळी घेतले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की, प्रस्तावना वगळण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ मुंबई यांचे कडील कोणत्या सभेत घेण्यात आला. व त्याचे कारण काय याची माहिती त्यांना मिळाली नाही असे त्यांनी नमुद केले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, सदर पुस्तकातील प्रस्तावना वगळण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतीक मंडळ मुंबई यांचेकडे कोणत्याही सभेत घेण्यात आलेला दिसून येत नाही म्हणून सदरची वस्तुस्थिती अपीलार्थीस कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतीक मंडळ यांच्या कोणत्याही सभेत प्रस्तावना वगळल्याचे दिसत नाही असे स्पष्टपणे अपीलार्थीस विनामुल्य जनमाहिती अधिकारी यांनी कळवावे.

२. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन निर्णय दिलेला दिसत नाही म्हणून भविष्यात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर त्याची सुनावणी घेऊन निर्णय निर्गमित करावा अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

३. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४२९/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री संपत तुकाराम रामटेके<br>अध्यक्ष, सिकलसेल सोसायटी ऑफ इंडिया<br>७१२, उत्कर्ष निर्माण, सदर, नागपूर-१. | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई<br>शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जार्जेस हॉस्पीटल परिसर, पीडिमेलो रोड,<br>सी एस टी जवळ, मुंबई-१ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी<br>वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई<br>शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत, सेंट जार्जेस हॉस्पीटल परिसर, पीडिमेलो रोड,<br>सीएसटी जवळ, मुंबई-१ | - | **उत्तरवादी** |

## (आदेश पारित दिनांक २९/०६/२०११)

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संचालनालय, मुंबई श्री विसपुते प्रशासन अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई तर्फे श्री दोखे मुख्य प्रशासन अधिकारी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर हे हजर आहेत.

२.  अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. ०८/१०/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई यांचेकडे सिकलसेल यासारख्या दुर्धर आजारांसंबंधित एकूण १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. तथापी त्यांना विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सह संचालक,  वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय  निर्गमित करण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, मााहिती अधिकारी तसेच सहायक जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीने विचारलेल्या माहिती संदर्भात, सहाय्यक माहिती अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र. संवैशिवसं/माअ/संतुरामटेके/३-अ, दि. २३/०२/२०११ अन्वये कळविण्यात आले होते. तसेच सदरची माहिती विचारण्यासाठी त्यांनी जे. जे. रुग्णालयातील तज्ञांचे सहकार्य घ्यावे म्हणून त्यांनी अर्ज केला होता. परंतू त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.  जनमाहिती अधिकारी वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय श्री विसपुते प्रशासन अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.०८/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि.११/१०/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही आरोग्य विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांनी सदरचा माहितीचा अर्ज दि.२६/१०/२०१० रोजी आरोग्य विभागाकडे हस्तांतरण केला आणि त्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलार्थीने प्रथम अपील सहसंचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई यांचेकडे दाखल केले.

४.  प्रथम अपीलाचा निर्णय दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री दोखे, मुख्य प्रशासन अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले. श्री दोखे यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, प्रथम अपीलाच्या निर्णयात माहिती अधिकारी यांना अपीलार्थीने विचारलेली माहिती त्यांना तात्काळ पुरविण्यात यावी आणि सदरची माहिती देण्यासाठी त्यांनी जे.जे. रुग्णालयातील तज्ञांचे सहकार्य घ्यावे असेही  कळविले असल्याचे त्यांनी सांगितले.

जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की, अपीलार्थीस प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार योग्य ती माहिती उपलब्ध होण्याच्या दृष्टिकोनातून दि. २४/१२/२०१० रोजी संचालक, आरोग्य सेवा मुंबई आणि अधिष्ठाता जे.जे. रुग्णालय मुंबई यांना पत्र लिहून अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे अभिप्राय उपलब्ध करुन देण्याच्याबाबत कळविले आहे कारण अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावयाची माहिती ही तज्ञांच्या अभिप्रायानुसार उपलब्ध करुन द्यावयाची आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. मात्र संचालक आरोग्य सेवा मुंबई आणि अधिष्ठाता जे.जे. रुग्णालय मुंबई यांचेकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती किंवा अभिप्राय उपलब्ध झालेली नाही म्हणून सदरची माहिती त्यांच्याकडे उपलब्ध करण्यासाठी जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी योग्य तो पाठपुरावा करणे आवश्यक असल्याचे दिसून येते. कारण अपीलार्थीने मागितलेली माहिती ही व्यापक जनहिताच्या संबंधातातील आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संचालक, आरोग्य सेवा मुंबई आणि अधिष्ठाता जे.जे. रुग्णालय मुंबई आणि संचालक, वैद्यकीय शिक्षण व संचालनालय मुंबई यांचेशी संपर्क साधून आणि विचारविनिमय करुन तज्ञ म्हणून त्यांचे अभिप्राय अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात प्राप्त करुन घ्यावे. आणि त्यांच्याकडून अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी संचालक, आरोग्य सेवा मुंबई आणि संचालक, जे. जे. रुग्णालय मुंबई तसेच वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय मुंबई यांचेशी संपर्क साधून आणि विचारविनीमय करुन तज्ञ म्हणून त्यांचे अभिप्राय प्राप्त करुन अपीलार्थीस मुद्येनिहाय व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४३२/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री सुरेश कवडुजी पद्मशाली<br>पोलीस स्टेशन मागे, गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी<br>जिल्हाधिकारी कार्यालय गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी<br>गडचिरोली<br>ता. जि. गडचिरोली | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १०/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी गडचिरोली सौ किरण कुळकर्णी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी गडचिरोली हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सौ कीरण कुळकर्णी ह्या आयोगापुढे उपस्थित आहेत. त्यांनी आयोगापुढे

सांगितले की, अपीलार्थीचा दि.२३/१२/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने या माहिती अर्जात महसूल कर्मचारी संघटनेला दिलेला भुखंड रद्य करण्याबाबत आणि मौजा रामपूर तुकुम येथील सर्व्हे नं. ९६/१ चा ७/१२ चा उतारा व नकाशाची प्रत इ. बाबत त्यांनी माहिती मागितली होती. अपीलार्थीने मागितलेल्या माहिती संदर्भात माहिती काढण्यात आली आणि अपीलार्थीस दि. ०१/०१/२०११ च्या पत्रान्वये ३ मुद्यांवर माहिती उपलब्ध करुन दिली आणि त्यामध्ये असे नमुद केले की, महसूल कर्मचारी संघटनेला दिलेला भुखंड रद्य करुन भ्रष्टाचाराची चौकशी करण्याबाबत पत्र प्राप्त झाले असून सदरच्या पत्रावर चौकशी करण्यासाठी तहसिलदार गडचिरोली यांना कळविले असून त्याचा चौकशी अहवाल अद्यापपर्यंत प्राप्त झालेला नाही असे अपीलार्थीस कळविण्यात आले. त्याचप्रमाणे मौजा रामपुर तुकुम येथील सर्वे नं. ९६/१ चा ७/१२ चा अधिकार अभिलेख व नकाशा तहसिलदार गडचिरोली व तलाठी रामपूर तुकुम यांचेकडे रितसर अर्ज करुन प्राप्त करुन घ्यावा कारण सदरची माहिती त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नाही. म्हणून त्यांनी अपीलार्थीस त्याप्रमाणे कळविले. त्याचप्रमाणे मौजा रामपुर तुकुम येथील सर्व्हे नं.९६/१ आराजी ०.९५ हे. आर. पैकी ०.३४ हे.आर. जमिन अध्यक्ष महसूल कर्मचारी संघटना यांना दिलेली जमीन सरकार जमा करण्याबाबत आदेश पारित करण्यात आले नाही. म्हणून त्याबाबतच्या आदेशाची प्रत अपीलार्थीस पुरविता येत नाही व त्याबाबत त्यांना कळविले असल्याचे सौ कुळकर्णी यांनी आयोगापुढे सांगितले. परंतू सदर माहितीने अपीलार्थीचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी अप्पर जिल्हाधिकारी यांचेकडे दि.०२/०२/२०११ रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि दि. ०९/०३/२०११ रोजी प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमित करुन जनमाहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे प्रथम अपील खारीज केले असल्याचे सौ. कुळकर्णी यांनी सांगितले.

३. प्रस्तुत प्रकरणी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी सौ कुळकर्णी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की, दरम्यानच्या काळात तहसिलदार गडचिरोली यांचा चौकशी अहवाल त्यांच्याकडे प्राप्त झाला आणि त्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे तहसिलदार गडचिरोली यांचा चौकशी अहवाल आणि त्यावर त्यांचे प्रतिवेदन जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडे दि. १०/०३/२०११ च्या

पत्रान्वये पुढील कार्यवाहीसाठी सादर केला आणि त्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिली. त्यानंतर जिल्हाधिकारी गडचिरोली यांचेकडून प्रस्तुत प्रकरणात दि. ०४/०५/२०११ रोजी निर्णय घेण्यात येवून त्यामध्ये असे नमुद केले की, प्रश्नांकित जमिन शासकीय नियमानुसार मंजूर करण्यात आली आहे. व त्यावर बांधकाम सुरु करण्यात आले आहे. सदरची संघटना कर्मचाऱ्यांचे हित जोपासणारी आहे व कोणाच्याही वैयक्तिक मालकीची नसल्यामुळे सदर भुखंड वाटपात घोटाळा झाला असे म्हणणे संयुक्तिक नाही. तसेच सदरचा भुखंड तांत्रिक बाबी लक्षात घेता सरकार जमा करणे आवश्यक वाटत नाही अशा प्रकारचा निर्णय जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी प्रस्तुत प्रकरणात घेतला असून सदरच्या पत्राची प्रत अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली असेही जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे प्रस्तुत प्रकरणी म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, त्यांनी अपीलार्थीच्या माहिती अर्जाला अनुसरुन त्यांनी दि.०१/०१/२०११ रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असून प्रस्तुत प्रकरणात जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी पारित केलेला दि. ०४/०५/२०११ चा आदेश देखील अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेला असल्यामुळे अपीलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे म्हणून अपीलार्थीचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४३०/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री निलकंठ काशिनाथ ठाकरे<br>मु. वेळवा, पो. पोंभुर्णा<br>ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर -४४२ ५०६ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी<br>पंचायत समिती पोंभुर्णा<br>ता. पोंभुर्णा जि. चंद्रपूर -४४२ ५०६ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सचिव<br>ग्राम पंचायत वेळवा<br>ता. पोंभूर्णा जि. चंद्रपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक २९/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. ११/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक २९/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. २०/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत वेळवा, पंचायत समिती पोंभूर्णा जि. चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज सादर करुन ग्राम पंचायत वेळवा या ग्रामपंचायतीला सन २००९-२०१० आणि सन २०१०-२०११ या वर्षात वेगवेगळया कामावरती प्राप्त झालेल्या निधीच्या संदर्भात १ ते ८ मुद्यांवर माहिती मागितली होती. त्यामध्ये प्रामुख्याने १२ वा वित्त आयोग

BRGF, महाराष्ट्र ग्रामिण रोजगार हमी योजना, दलित वस्ती सुधारखंड इ. च्या संदर्भात प्राप्त झालेला निधी व त्यावरील खर्च आणि त्या संदर्भात झेरॉक्स पावत्यांची प्रत त्यांनी मागितली होती. तथापी त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी संवर्ग विकास अधिकारी पंचायत समिती पोंभुर्णा यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये वरिष्ठ कार्यालयाकडून निधी प्राप्त करुन घेऊन अपीलार्थीस ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे विनामुल्य माहिती देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र अद्यापपर्यंत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले. आणि ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध व्हावी असे अपीलार्थीने आयोगापुढे सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत वेळवा यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि.२२/१०/२०१० रोजी माहितीचा अर्ज ग्राम पंचायत कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सन २००९-१० आणि सन २०१०-२०११ या वर्षात ग्राम पंचायतीला आलेल्या संपूर्ण निधीची माहिती तसेच कॅशबुकची प्रत, पासबुकची प्रत व बिलांच्या प्रती इ. स्वरुपात माहिती मागितली होती. परंतू सदर माहिती ही मोठ्या प्रमाणात असल्यामुळे त्या माहितीची एकूण पृष्ठे १०८५ होती आणि त्याचा झेरॉक्स खर्च रु.१५९५/- अपेक्षित होता मात्र ऐवढा खर्च करण्याकरिता ग्राम पंचायत फंडामध्ये निधी उपलब्ध नसल्यामुळे झेरॉक्स प्रती काढण्यास अडचण आली म्हणून अपीलार्थीस दि. १९/११/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागितलेली मुद्या क्र.१, २, ३, ४, ५, ६ व ७ ची माहिती ग्राम पंचायत कार्यालयात उपलब्ध आहे मात्र मुद्या क्र. ८ ची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही तरी उपलब्ध असलेली माहिती आपणास पाहण्याकरिता ग्राम पंचायत कार्यालयात दि.२२/११/२०१० रोजी सकाळी १०-०० वाजता उपस्थित राहून माहितीचे प्रत्यक्ष निरिक्षण करुन घ्यावे असे अपीलार्थीस कळविल्याचे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर सांगितले. मात्र अपीलकर्ता माहितीचे निरिक्षण करण्यास हजर झाले नाही. त्यानंतर अपीलार्थीने संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती पोंभूर्ण यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. १२/०१/२०११ रोजी निर्गमित करण्यात आले. त्यात असे नमुद केले की, माहितीच्या झेरॉक्स प्रती काढण्याकरिता ग्रामपंचायतीकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी निधीची मागणी वरिष्ठ कार्यालयास करावी व निधी प्राप्त होताच संबंधितास जनमाहिती अधिकारी यांनी पुरविण्याचे निर्देश दिले होते.

४.	प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत वेळवा यांनी आणि सरपंच ग्राम पंचायत वेळवा यांनी दोघांच्या सहीने दि.२५/०१/२०११ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे निधीच्या मागणीचे पत्र पाठवून अपीलार्थीस द्यावयाच्या माहितीच्या झेरॉक्स प्रतीसाठी रु. १५५०/- खर्च अपेक्षित होते. म्हणून सदरची रक्कम त्यांना देण्याबाबत त्यांनी विनंती केली होती. मात्र अदयापपर्यंत जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडून त्यांना निधी उपलब्ध झाला नाही म्हणून अपीलार्थीस ते दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील असल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती पुरविण्यासाठी ग्राम पंचायतीकडे सध्या निधी उपलब्ध नाही म्हणून प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे सचिव यांनी जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे निधीची मागणी केली आहे सदर निधी प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल त्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी पुन्हा जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडे निधी प्राप्त करण्याबाबत पाठपुरावा करणे संयुकितक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजुर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी तथा सचिव यांनी अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावयाच्या माहितीच्या संदर्भात जिल्हा परिषद चंद्रपूर यांचेकडून निधी प्राप्त करुन घेण्याचा पाठपुरावा करावा आणि निधी प्राप्त झाल्यानंतर अपीलार्थीस विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

PTO

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४३५/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री देवेन्द्र चंद्रसेन वानखडे<br>११/२, स्वामी समर्थ अपार्टमेंट, वंजारी नगर, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ०९ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव (परिक्षा)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>परिक्षा भवन, लक्ष्मी नारायण तांत्रिक संस्था परिसर, अमरावती रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक कुलसचिव (सामान्य परिक्षा)<br>राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर<br>परिक्षा भवन, लक्ष्मी नारायण तांत्रिक संस्था परिसर, अमरावती रोड, नागपूर | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. जनमाहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव (सामान्य परिक्षा) रा.सं.तु.म.नागपूर विद्यापीठ नागपूर श्री उमेश उईके हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा कुलसचिव, (परक्षिा) श्री अनिल हिरेखण हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि.३०/१०/२०१० रोजी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा कुलसचिव, (सामान्य परिक्षा) नागपूर विद्यापीठ यांचेकडे सचिन कोल्हापुरे

नामांकन क्र. NU/A3/3803 हा विद्यार्थी बी.ए. अंतिम परिक्षा केव्हा पास झाला (बी. ए. पदवी) पास होण्याचे वर्ष व परिक्षा कोणत्या केंद्रावरुन दिली होती त्या परिक्षा केंद्राची माहिती मागितली होती. परंतू जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही. म्हणून यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना अपेक्षित माहिती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीचेवेळी सांगितले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा सहा. कुलसचिव श्री उमेश उईके आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपलकुलसचिव श्री हिरेखण हे उपस्थित आहेत. जनमहिती अधिकारी श्री उईके यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ३०/१०/२०१० चा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला. अपीलार्थीने मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे अपीलार्थीस दि.१९/११/२०१० च्या पत्रान्वये असे कळविले की, आपण मागितलेली माहिती ही त्रयस्थ व्यक्तीशी संबंधित असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ११ (१) अन्वये त्रयस्थ पक्षाचे अभिप्राय घेणे आवश्यक असल्यामुळे श्री सचिन कोल्हापुरे यांच्या राहण्याचा पूर्ण पत्ता विद्यापीठाच्या कार्यालयास प्राप्त करुन दिल्यास त्याची संमती किंवा अनुमती घेऊन पुढील कार्यवाही करणे योग्य होईल असे कळविण्यात आले. परंतू अपीलकर्ता यांनी सचिन कोल्हापुरेचा पूर्ण पत्ता कळविला नाही म्हणून सदरची माहिती त्यांच्या संमतीशिवाय उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपकुलसचिव श्री हिरेखण यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले होते. त्याला अनुसरुन तात्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि.१६/१२/२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिला. त्यामध्ये असे नमुद केले की, सदर माहिती ही त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे श्री सचिन कोल्हापुरे याचा संपूर्ण पत्ता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस मागितला होता मात्र पत्ता उपलब्ध करुन देण्यात आला नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांना माहिती देता आली नाही. या कारणास्तव प्रथम अपील खारीज करण्यात आले.

५.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलार्थीने सचिन कोल्हापुरे यां विद्यार्थ्याची सन २००९-२०१० या वर्षात बी. ए. परिक्षा पास झाला अगर कसे याबाबतची माहिती मागितली होती. विद्यापीठाकडून दरवर्षी परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांचे निकाल जाहीर होत असतात. आणि सदरचे रिझल्ट पाहण्यासाठी जनसामान्यांना देखील खुले असतात. म्हणून प्रस्तुत प्रकरणात विद्यापीठाने सन २००९-२०१० या वर्षात बी. ए. पदवीचा जो रिझल्ट जाहीर केला आहे त्या निकालाची पाहणी करुन अपीलकर्त्यास श्री सचिन कोल्हापुरे च्या बाबत माहिती उपलब्ध करुन देणे शक्य होईल. म्हणून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१.	अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी यांनी सन २००९-२०१० या वर्षात बी.ए. परिक्षेचा जो रिझल्ट जाहीर केला आहे त्या रिझल्टची पाहणी करुन सचिन कोल्हापुरे या विद्यार्थ्याची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.

२.	अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**अपील क्र.४३४/नाग/२०११**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री विश्वानाथ गंगाराम खांडेकर<br>प्लॉट क्र.११-बी, जोशीवाडी, कुकडे ले आऊट<br>मैनाबाई हायस्कुल समोर, अजनी रेल्वे पोलीस क्वार्टरजवळ, नागपूर-२७ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक (वाहतुक)<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंड, मुंबई<br>महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल मुंबई-८ | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा उप महाव्यवस्थापक (चालन)<br>महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मुंबई<br>महाराष्ट्र वाहतुक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल मुंबई-८ | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. १४/०३/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.०१/०६/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता हजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, त्यांनी दि. १०/०१/२०११ रोजी जनमाहिती अधिकारी मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज सादर करुन कास्ट्राईब राज्य परिवहन कर्मचारी संघटना यांचेकडील दि.११/०८/२०१० आणि दि.३०/०८/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. मात्र जनमाहिती

अधिकारी यांचेकडून त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांनी दि. ०८/०२/२०११ रोजी प्रथम अपील महाव्यवस्थापक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय यांचेकडे दाखल केले. परंतू प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी नागपूर श्री एस. एम. जगताप हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय नियंत्रक नागपूर श्री अंबाडेकर हे उपस्थित आहेत आणि मुंबईच्या मुख्यालयातील महाव्यवस्थापक कॅप्टन रत्नपारखी हे उपस्थित आहेत.

जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी श्री जगताप यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. १०/०१/२०११ चा माहितीचा अर्ज त्यांच्या मुंबई कार्यालयाकडे दि.१७/०१/२०११ रोजी प्राप्त झाला होता. आणि मुंबई कार्यालयाने सदरचा माहितीचा अर्ज दि.२५/०१/२०११ रोजी विभाग नियंत्रक नागपूर यांचे कार्यालयाकडे पाठविला त्यानंतर विभाग नियंत्रक नागपूर यांनी सदरच्या माहितीचा अर्ज संबंधित जनमाहिती अधिकारी श्री जगताप यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठविला. श्री जगताप यांचेकडे माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर जनमाहिती अधिकारी श्री जगताप यांनी अपीलार्थीस दि. ०९/०२/२०११ रोजी पत्र पाठवून असे कळविले की, माहितीचा अधिकार अधिनियम अंतर्गत आपण मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक राज्य परिवहन मुंबई यांना सादर केलेला अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला असून सदर अर्जात नमुद करण्यात आलेल्या विषयाबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. कार्यवाही अंती आपणास कळविण्यात येईल अशी माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ०९/०२/२०११ च्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपीलार्थीने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात दि. २६/०४/२०११ च्या पत्रान्वये अपीलार्थीच्या दि. ११/०८/२०१० च्या तक्रार अर्जाला अनुसरुन केलेल्या अंतिम कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिल्याचे श्री जगताप यांनी सांगितले. आणि सदरचे दि.२६/०४/२०११ चे पत्र अपीलार्थीस पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा पुरावा त्यांनी आयोगापुढे दाखविला. मात्र दि. २६/०४/२०११ चे पत्र देखील अपीलार्थीस पोस्टाद्वारे प्राप्त झाले नाही असे अपीलार्थीने आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दि. २६/०४/२०११ च्या पत्राची प्रत अपीलार्थीस आयोगापुढे उपलब्ध करुन दिली.

४. अपीलार्थीने प्रस्तुत प्रकरणात प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. परंतु दि.०८/०२/२०११ च्या प्रथम अपीलावर निर्णय दिलेला दिसत नाही. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि. ११/०८/२०१० तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र दि.३०/०८/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती अपीलार्थीस उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून प्रस्तुत प्रकरणी अपीलार्थीस त्यांच्याकडील दि. ३०/०८/२०१० च्या पत्राला अनुसरुन केलेल्या कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलार्थीचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१. अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत जनमाहिती अधिकारी तथा विभागीय वाहतुक अधिकारी नागपूर यांनी अपीलार्थीच्या दि. ३०/०८/२०१० च्या तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणी प्रथम अपील दि. ०८/०२/२०११ च्या पत्रान्वये मुंबई कार्यालयाकडे दाखल केलेले दिसते. तथापी या प्रथम अपीलाचा निर्णय घेण्यात आलेला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेवर सोपविलेली जबाबदारी पार पाडलेली नाही म्हणून त्यांना सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याची पूर्नावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

P.T.O.

२.  अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**मा. राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अंतर्गत अपील.**

**<u>अपील क्र.३९९/नाग/२०११</u>**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री रामसागर पुंडलिक पिलेवान<br>८३, हिंदुस्थान कॉलनी, वर्धा रोड, नागपूर<br>ता. जि. नागपूर - ४०००१५ | - | **अपीलकर्ता** |

**वि रु ध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| २. | प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक भूमी अभिलेख (सलग्न)<br>जमाबंदी आयुक्त (भूमापन), पुणे<br>नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे | - | **उत्तरवादी** |
| ३. | जनमाहिती अधिकारी तथा कार्यालय अधिक्षक<br>जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमी अभिलेख, पुणे<br>नवीन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, विधानभवन समोर, पुणे | - | **उत्तरवादी** |

**(आदेश पारित दिनांक ३०/०६/२०११)**

१. अपीलकर्ता यांनी दि. २१/०२/२०११ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे नागपूर कार्यालयातून दि.३०/०५/२०११ रोजी नोटीस काढून दिनांक ३०/०६/२०११ रोजी अपीलाचे सुनावणीस नागपूर येथील आयोगाचे कार्यालयात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. प्रस्तुत प्रकरणी सुनावणीकरिता अपीलकर्ता गैरहजर आहेत. उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी माहिती अधिकाराखालील अर्जान्वये दि.०७/१०/२०१० रोजी जनमाहिती अधिकारी जमाबंदी आयुक्त व संचालक भूमि अभिलेख पुणे यांचेकडे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि.१३/०२/२०१० रोजी तक्रार अर्ज करुन अर्जदाराच्या मिळकतीची घरफोडी करुन व सामानाची चोरी करुन

अर्जदाराचे आर्थिक नुकसान केल्यामुळे नुकसान भरपाई मिळणेबाबत व भ्रष्ट कर्मचाऱ्यांवर केलेल्या कार्यवाही बाबतची माहिती मागितली आहे.

३. आज आयोगापुढे अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तुत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र आज आयोगापुढे सुनावणीस जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे उपअधिक्षक भूमि अभिलेख पवनी श्री जे.एस. राठोड हे हजर आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख श्री पेंदराम हे हजर आहेत.

जनमाहिती अधिकारी यांचे वतीने उपस्थित असलेले श्री जे. एस. राठोड यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलार्थीचा दि. ०७/१०/२०१० चा माहितीचा अर्ज जमाबंदी आयुक्त व संचालक, भुमि अभिलेख, महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे दि. ११/११/२०१० रोजी प्राप्त झाला होता. अपीलार्थीने सदरच्या अर्जात मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांचेकडे दि. १३/०२/२०१० रोजी सादर केलेल्या तक्रार अर्जानुसार संबंधितांवर केलेल्या कार्यवाहची माहिती मागितली होती. अपीलार्थीच्या माहितीला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस दि.०१/१२/२०१० रोजी पत्र पाठवून असे कळविले की, आपल्या अर्जात मागणी केलेली माहिती पुरविण्यासाठी तयार आहे आपणास या कार्यालयातील उपलब्ध असलेली माहिती पुरविण्यासाठी माहितीचे शुल्क रु. २९/- चा भरणा करावा असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस कळविले. मात्र अपीलार्थीने माहितीचे शुल्क भरणा केले नाही आणि त्यानंतर दि. २५/११/२०१० च्या अर्जाने प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसंचालक, जमाबंदी आयुक्त पुणे यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरचे प्रथम अपील पुणे यांच्या कार्यालयाकडे दि.३०/११/२०१० रोजी प्राप्त झाल्याचे दिसून येते. त्यावर सुनावणी घेण्यात आली. आणि प्रथम अपीलाचा निर्णय दि. ०३/०२/२०११ रोजी देण्यात आला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्ता श्री पिलेवान यांना माहितीच्या कायद्यान्वये मौजे पवनी येथील नगर भुमापन क्र. २३८२ चे खोट्या क्षेत्रफळाची नोंद करणाऱ्या दोषी कर्मचारी/अधिकारी यांचेवर काय कार्यवाही केली ही माहिती अपेक्षित आहे. तथापी उपसंचालक भुमी अभिलेख नागपूर प्रदेश नागपूर यांचेकडील दि.३१/०८/२०१० चे पत्रातील मुद्या क्र.३ चे अवलोकन केले असता उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचे दि.१९/०५/२०१० नुसार खरेदी खता प्रमाणे नगर भुमापन क्र. २३८२ चे फेरफार केलेले असल्याने कार्यालयातील

कर्मचारी हे दोषी नसल्याबाबत अपीलार्थीस कळविण्यात आले आहे त्यामुळे अपीलार्थीचे प्रथम अपील खारीज करण्यात आले आहे.

४. आज आयोगापुढे सुनावणीकरिता उपस्थित असलेले श्री राठोड आणि श्री पेंदराम यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, संबंधित कर्मचाऱ्यांविरुध्द कार्यवाही होण्याची अपीलार्थीची अपेक्षा आहे. मात्र उपसंचालक भूमि अभिलेख नागपूर यांचेकडील दि. ३१/०८/२०१० चे पत्रातील मुद्या क्र. ३ नुसार उप अधिक्षक भूमि अभिलेख यांचेकडील दि. १९/०५/२०१० नुसार खरेदी खता प्रमाणे नगर भुमापन क्र.२३८२ चे फेरफार केलेले असल्यामुळे कार्यालयीन कर्मचारी दोषी नसल्याबाबत दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांची चौकशी अहवालाच्या गुणवत्तेबाबत तक्रार आहे. मात्र चौकशी अहवालाच्या गुणवत्तेबाबतची बाब माहिती आयुक्तांच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी घेतलेला निर्णय योग्य दिसून येतो. तसेच यापूर्वी देखील अपीलार्थीचे अशाच स्वरुपाचे अपील क्र. १०३०/२०१० दि.१३/०८/२०१० हे खारीज करण्यात आले आहे. म्हणून सदरचे अपील देखील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१. अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येते.

२. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

**नागपूर**

(पी डब्ल्यू पाटील)
**राज्य माहिती आयुक्त**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**

**जावक क्र...............दिनांक..................**

मा. राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचे मूळ निर्णयाची प्रमाणित प्रत.
निवड नस्ती.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग**
**खंडपीठ नागपूर**